सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १६९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ३० जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## रशिया त्सुनामीने हादरला;८.८ रिश्टर स्केल तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप

### जपान पासून कॅलिफोर्नीया पर्यंत त्सुनामी अलर्ट जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०कामचात्स्की**

रशियाच्या कामचात्का द्वीपकल्पाच्या किनारपट्टीवर बुधवारी ८.८ रिश्टर स्केल तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाला. या भूकंपानंतर मोठ्या प्रमाणात त्सुनामी आली असून, किनारपट्टीवरील लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात येत आहे. दरम्यान, त्सुनामीचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, त्यामध्ये समुद्रकिनाऱ्यालगतच्या अनेक इमारती पाण्यात बुडालेल्या दिसत आहेत.




दरम्यान, त्सुनामीच्या इशाऱ्यानंतर रशियाच्या पूर्वेकडील प्रांताच्या गव्हर्नरांनी नागरिकांना किनाऱ्यापासून दूर राहा असे आवाहन केले होते. त्सुनामीपूर्वीचा हा भूकंप अंदाजे १९ किलोमीटर खोलवर झाला होता आणि पेत्रोपावलोव्हस्क-कामचात्स्की शहराच्या ईशान्येकडील सुमारे १२५ किलोमीटर अंतरावर त्याचे केंद्र होते. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, त्सुनामीच्या लाटा ४ मीटर उंचीपर्यंत उसळल्या असून, अनेक भागांमध्ये मोठे नुकसान झाले आहे.

आजचा भूकंप गंभीर होता आणि गेल्या काही दशकांमधील सर्वात तीव्र होता असे कामचात्काचे गव्हर्नर व्लादिमीर सोलोडोव्ह यांनी टेलिग्राम मेसेजिंग ॲपवर पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये म्हटले आहे. त्यांनी असेही म्हटले आहे की, प्राथमिक माहितीनुसार, यामध्ये कोणतीही जीवीत हानी झाली नाही, परंतु एका शाळेचे नुकसान झाले आहे.

भूकंपानंतर ज्या भागांना याचा फटका बसला आहे, त्या भागातील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. ज्यात इमारतींमध्ये जोरदार हादरे बसल्याचे दिसून येत आहे. एका व्हिडिओमध्ये, भूकंपाचा धक्का बसला तेव्हा एका निवासी अपार्टमेंटमधील फर्निचर जोरदार हादरताना दिसत आहे.

रशियातील या त्सुनामीनंतर जपान, हवाई आणि पॅसिफिकच्या इतर भागांसाठी त्सुनामीचा इशारा देखील देण्यात आला आहे. जपानच्या हवामान संस्थेने इशारा दिला आहे की, ०: १०० जीएमटीच्या सुमारास ३ मीटर उंचीच्या लाटा किनारी शहरांना धडकू शकतात.

अमेरिकेच्या त्सुनामी इशारा प्रणालीने रशिया आणि जपानच्या काही किनाऱ्यांवर पुढील तीन तासांत धोकादायक त्सुनामी लाटा येण्याचा इशारा देखील जारी केला आहे. अमेरिकेच्या गुआम बेट प्रदेश आणि मायक्रोनेशियाच्या इतर बेटांवर देखील त्सुनामी वॉच लागू करण्यात आला आहे. कामचत्का आणि रशियाचा सुदूर पूर्व पॅसिफिक रिंग ऑफ फायरवर वसलेला आहे, जो भूगर्भीयदृष्ट्या सक्रिय प्रदेश आहे जे भूकंप आणि ज्वालामुखी प्रवण क्षेत्र आहे.

## 'काळजीपूर्वक ऐका, मोदी-ट्रम्प यांनी चर्चा केली नाही'; राज्यसभेत एस जयशंकर संतापले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नवी दिल्ली**

आज राज्यसभेत परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी काँग्रेसवर टीका केली. पहलगाम दहशतवादी हल्लयानंतर स्थगित करण्यात आलेल्या सिंधू पाणी करारावरूनही त्यांनी टीका केली.

ऑपरेशन सिंदूर'बाबत विरोधक अनेकदा सरकारवर आरोप करत आहेत. ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदी करार केला आहे, असल्याचा दावा करत आहेत. हा दावा भारत सरकार हे आरोप फेटाळला आहे.

राज्यसभेत 'ऑपरेशन सिंदूर'वरील चर्चेदरम्यान परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर म्हणाले, मी त्यांना सांगू इच्छितो की त्यांनी काळजीपूर्वक ऐकावे. २२ एप्रिल ते १६ जूनपर्यंत राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि पंतप्रधान मोदी यांच्यात



एकही फोन कॉल झाला नाही.

यावेळी एस जयशंकर यांनी इतिहासाचे संदर्भही दिली. जयशंकर म्हणाले, काही लोक इतिहास विसरू इच्छितात. कदाचित ते त्यांना शोभत नसेल. त्यांना फक्त त्या गोष्टी लक्षात ठेवायच्या असतात ज्या त्यांच्या मनाला आनंद देतात.

एस जयशंकर यांनी १९६० मध्ये संसदेत जवाहरलाल नेहरूंच्या विधानाची आठवण करून दिली. ३० नोव्हेंबर १९६० रोजी नेहरू म्हणाले होते की संसदेने पाण्याचे प्रमाण किंवा पैशाच्या व्यवहाराचा निर्णय घेऊ नये. लोकांनी त्याला विरोध केला,असंही जयशंकर म्हणाले.

नेहरू म्हणाले होते की हा करार पाकिस्तानी पंजाबच्या हिताचा आहे. पण त्यांनी काश्मीर, पंजाब, राजस्थान किंवा गुजरातमधील शेतकऱ्यांबद्दल एकही शब्द बोलले नाहीत', असा टोलाही जयशंकर यांनी लगावला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहरूंच्या चुका सुधारण्याचे काम केले आहे. आम्हाला ६० वर्षांपासून सांगितले जात होते की काहीही होऊ शकत नाही. नेहरूंच्या चुका सुधारता येत नाहीत. परंतु मोदी सरकारने ते शक्य आहे हे दाखवून दिले. कलम ३७० रद्द करण्यात आले आणि आता सिंधू पाणी करार देखील दुरुस्त केला जात आहे, असंही एस जयशंकर म्हणाले.

## पाकिस्तान तोंडघशी! पहलगामचे फोटो TRF ने पोस्ट केले, दुसऱ्यांदा जबाबदारी स्वीकारली, UNSC च्या रिपोर्टमध्ये दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नवी दिल्ली**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यावरून पाकिस्तान पुन्हा एकदा तोंडघशी पडला आहे. पहलगाम हल्ल्याची जबाबदारी टीआरएफ दहशतवादी संघटनेनी दोन वेळा स्वीकारली आहे. त्याशिवाय त्यांनी हल्ल्याचे फोटोही पोस्ट केले होते, असा दावा UNSC मध्ये रिपोर्टमध्ये सादर करण्यात आला आहे. या रिपोर्टनुसार, पहलगाम दहशतवादी हल्ला TRF नेच केला आहे. पहलगाम हल्ल्यासाठी लष्कर ए तोय्यबाने दहशतवाद्यांना मदत केली. त्याशिवाय असा हल्ला होऊच शकत नाही, असेही रिपोर्ट्समध्ये म्हटले आहे.



संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या (यूएनएससी) देखरेख अहवालात पहलगाम दहशतवादी हल्ल्यामागे टीआरएफच असल्याची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे पाकिस्तानचा दहशतवादाशी संबंध असल्याचे पुन्हा एकदा जगासमोर उघड झालेय. लष्कर-ए-तोय्यबाच्या पाठिंब्याशिवाय हा हल्ला शक्य झाला नसता, असेही अहवालात म्हटले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी नाकारणारा पाकिस्तान जागतिक पातळीवर आता तोंडघशी पडला.

पहलगाम दहशथवादी हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानने घेतली नव्हती. या हल्ल्यातील आपला सहभाग पाकिस्तान सातत्याने नाकारत होता. मात्र, यूएनएससीच्या अहवालात पहलगाम हल्ल्यामागे टीआरएफची भूमिका असल्याचे स्पष्ट सांगितलेय. भारत सरकारने यासाठी सातत्याने प्रयत्न केले होते. मे महिन्यात भारताच्या एका पथकाने यूएनच्या १२६७ प्रतिबंध समितीसमोर याबाबत सविस्तर माहिती सादर केली होती.

टीआरएफ नावाच्या दहशतवादी संघटना २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात सहभागी होती. पाकिस्तानमधील लष्कर-ए-तोय्यबाच्या पाठिंब्याशिवाय हा हल्ला शक्य झाला नसता. यूएनएससीच्या पथकाने हेही स्पष्ट केले की, टीआरएफने या हल्ल्याची जबाबदारी दोनदा स्वीकारली आणि हल्ल्याच्या ठिकाणची छायाचित्रेही प्रसिद्ध केली.

पहलगाम हल्ल्यावरून वारंवार भारतावरच आरोप करणारा पाकिस्तान जगासमोर तोंडघशी पडला आहे. यूएनएससीच्या या अहवालामुळे भारताने केलेला दावा आता अधिक बळकट झाला आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे (यूएनएससी) एक पथक दहशतवादावर लक्ष ठेवते. या पथकाने आपल्या अहवालात पहलगाम हल्ल्याचा उल्लेख केला आहे. त्या अहवालात टीआरएफ नावाच्या संघटनेचा उल्लेख केला आहे. त्यांनी पहलगाम हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. टीआरएफ ही पाकिस्तानच्या लष्कर-ए-तोय्यबा या दहशतवादी संघटनेशी जोडलेली आहे. त्यांच्या पाठिंब्याशिवाय पहलगाम हल्ला शक्यच झाला नसता, असेही अहवालात म्हटले आहे.

## ट्रम्प सत्य सांगतील, म्हणून पंतप्रधान मोदी त्यांचे नाव घेत नाहीत; राहुल गांधींची बोचरी टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नवी दिल्ली**

काँग्रेस नेते राहुल गांधीऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतर भारत-पाकिस्तानमध्ये झालेल्या युद्धविरामारुन पंतप्रधान मोदींवर सतत टीका करत आहेत. काल त्यांनी लोकसभेत म्हटले की, पंतप्रधान मोदी स्पष्टपणे सांगू शकले नाहीत की, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा मध्यस्थीचा दावा खोटा आहे.



आज पुन्हा एकदा पंतप्रधानांवर टीका करताना त्यांनी म्हटले की, पंतप्रधान मोदी ट्रम्प यांचे नाव घेऊ शकत नाहीत, कारण त्यांना भीती आहे की, अमेरिकन अध्यक्ष संपूर्ण सत्य सांगतील.

संसदेच्या परिसरात पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी यांनी दावा केला की, पंतप्रधान मोदींनी डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव घेतले नाही, कारण त्यांना माहित आहे की, जर त्यांनी तसे केले, तर ट्रम्प संपूर्ण सत्य उघड करतील. ट्रम्प खोटं बोलत आहेत, असे मोदी म्हणालेच नाही. काय घडले आहे हे सर्वांना माहिती आहे. सध्या ट्रम्प यांना भारतासोबत व्यापार करार हवा आहे. आता यावरुनही ते मोदींवर दबाव आणतील, अशी बोचरी टीका राहुल यांनी केली.

या मुद्द्यावर काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी वाड्रा यांनी पंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्र्यांवर टाळाटाळ केल्याचा आरोप केला. डोनाल्ड ट्रम्प खोटं बोलत आहेत, असे मोदींनी थेट सांगावे, असे प्रियंका गांधी म्हणाल्या.

## राज्याच्या ७० आयटीआयमध्ये नवा अभ्यासक्रम; राज्य सरकारचा मोठा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या प्रशिक्षण महासंचालक यांनी राज्यातील ७० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आय.टी.आय.) नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता दिली आहे. तसेच चेंबूर येथे शासकीय उच्चस्तरीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापनेसाठी मान्यता देण्यात आली आहे. काळानुरूप बदलत्या अभ्यासक्रमामुळे रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होवून यामुळे महाराष्ट्रातील



आय.टी.आय मध्ये क्रांती घडणार आहे, असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील ७० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिक), ईव्ही मेकॅनिक (इलेक्ट्रिक व्हेईकल) हे नवीन अभ्यासक्रम शिकविण्यात येणार आहेत. पर्यावरण संवर्धनावर आधारित योजना राबविण्यार राज्य शासनाचा भर असून राज्यात सौर ऊर्जाशी निगडीत तंत्रज्ञानांची व सोलर टेक्निशियन तसेच मेकॅनिक इलेक्ट्रिक व्हेईकलची गरज लक्षात घेवून या क्षेत्रातील टेक्निशियन मागणी वाढणार आहे. त्यानुषंगाने दोन नवीन अभ्यासक्रमाची मागणी व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाने केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या प्रशिक्षण महासंचालक यांच्याकडे केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य विकास विभाग नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.रघुनाथ माशेलकर आणि मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या सूचना व सल्लयाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये काळानुरूप अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. सध्या राज्यातील ७० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये हा अभ्यासक्रम शिकविण्यात येणार आहे. ज्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रमांची मागणी करतील त्यांना मंजूरी देण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, असेही मंत्री श्री.लोढा यांनी सांगितले.

## शिवसेना चिन्ह आणि नाव वादाला पुन्हा तारीख पे तारीख

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालय २० ऑगस्ट रोजी अंतिम फैसला देणार होतं. मात्र, पुन्हा एकदा तारीख ते तारीख प्राप्त झाली आहे. राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्या वादामध्ये राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाकडे मागितलेल्या सल्लयावर उत्तर देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून घटनापीठाची स्थापना करण्यात आली आहे. हे घटनापीठ राष्ट्रपतींनी मागितलेल्या सल्लयांवर १९ ऑगस्टपासून सुनावणी सुरू करणार आहे. या घटनापीठाचे न्यायमूर्ती सूर्यकांत सुद्धा भाग असणार आहेत. त्यामुळे शिवसेना वादाचा फैसला आणखी काही दिवस पुढे जाण्याची शक्यता आहे.



न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोरच शिवसेना चिन्हाचा आणि पक्षाचा अंतिम फैसला होणार आहे. त्यामुळे सूर्यकांत घटनापीठाचे सदस्य असल्याने शिवसेना सुनावणी लांबणीवर पडली आहे. घटनापीठाची सुनावणी १९ ऑगस्टपासून ते १० सप्टेंबरपर्यंत होणार असल्याने शिवसेना प्रकरणावर कोणताही निर्णय घेण्याची शक्यता कमी असून त्यानंतर निर्णय येण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता शिवसेना चिन्ह आणि नावाच्या वादावर १५ सप्टेंबर किंवा ऑक्टोबरमध्ये निर्णय होण्याची शक्यता आहे. कदाचित १५ सप्टेंबरनंतर अंतिम तारीख निश्चित होऊन किंवा ऑक्टोबरमध्येच हे प्रकरण खंडपीठासमोर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिवसेना पक्ष कोणाची याची उत्सुकता अवघ्या काही दिवसांवर आली असताना पुन्हा एकदा तारीख पे तारीख भेटली आहे.

## अण्णासाहेब डांगे २३ वर्षांनी पुन्हा भाजपात परतले; जयंत पाटलांना धक्का

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०सांगली**

सांगलीतील ज्येष्ठ धनगर नेते आणि राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांचे समर्थक माजी मंत्री अण्णासाहेब डांगे यांनी आज भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत अण्णासाहेब डांगे यांच्यासह त्यांच्या दोन्ही मुलांचा भाजप प्रवेश झाला. सुपुत्र चिमण डांगे आणि विश्वनाथ डांगे यांचेही भाजपात स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे आरएसएसच्या मुशीत तयार झालेले आणि शिवसेना-भाजप युतीमध्ये मंत्री राहिलेल्या अण्णासाहेब डांगे हे २३ वर्षांनी स्वगृही परतल्याचे दिसून येत आहे. भाजपमध्ये असताना दिवंगत गोपीनाथ मुंडेच्या शिफारसीवरुन त्यांना मंत्रीपद मिळाले होते. या पक्षप्रवेश सोहळ्यावेळी देवेंद्र फडणवीसांनी डांगे यांच्या जुन्या काळातील राजकीय आठवणींना उजाळा दिला.



अण्णासाहेब डांगे यांनी यापूर्वी राज्यात काँग्रेसला सत्तेपासून रोखण्यात युतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत त्यांचे नेतृत्व तयार झाले होते, नंतरच्या काळात महाविकास आघाडी सरकार असताना त्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांच्या नेतृत्वात त्यांनी घड्याळ हाती बांधलं होतं. मात्र, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी आता ते पुन्हा भारतीय जनता पार्टीमध्ये परतत आहेत.

## राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, उत्कृष्ट काम करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना दरवर्षी बक्षीसे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

ग्रामीण भागात उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी यंदापासून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्याचा निर्णय मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थाना विविध गटात दरवर्षी २९० कोटी ३३ लाख रुपयांची एक हजार ९०२ बक्षीसे देण्यात येणार आहेत.



सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांची सांगड, गावपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय, लोकसहभाग व श्रमदानाच्या माध्यमातून लोकचळवळ अशा विविध क्षेत्रांत उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायती, पंचायती समित्या आणि जिल्हा परिषदांची पुरस्कारासाठी निवड केली जाणार आहे. यंदाच्या आर्थिक वर्षापासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरांवर 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविण्यात येणार आहे.

अभियानात विविध स्तर आणि गटात एक हजार ९०२ पुरस्कार दिले जाणार असून, अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर असा राहणार आहे. ग्रामपंचायतीसाठी राज्यस्तरावर प्रथम क्रमांकाला ५ कोटी रुपये, द्वितीय क्रमांक ३ कोटी रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी २ कोटी रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. या अभियानाच्या अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी राज्यस्तरावर ग्रामविकास व पंचायतराज मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १६ सदस्यांची समिती स्थापन करण्यात येणार आहे.

## संपादकीय ......

# भलतेच लाडके भाऊ..!

श्रावण महिना सुरू झाल्यानंतर बहीण-भावांना ओढ असते ती राखी पौर्णिमेच्या सणाची. आपल्या संस्कृतीमध्ये प्रत्येक नाते जपण्यासाठी कुठला ना कुठला तरी सण आहे आणि हेच वैशिष्ट्य आहे. बहीण भावाला राखी बांधते आणि भाऊ तिला घसघशीत ओवाळणी टाकतो ही राखी पौर्णिमेची प्रथा आहे. भाऊ येऊ शकत नसेल तर बहीण माहेरी जाऊन त्याला ओवाळते आणि बहीण येऊ शकत नसेल तर भाऊ तिच्या सासरी येऊन तिला ओवाळतो. परंतु हे नाते दरवर्षी अधिक मजबूत होत जाते.

सध्या राज्यामध्ये लाडक्या बहिणींचा बोलबाला आहे. विधानसभेला महायुतीने लाडक्या बहिणींना दरमहा ओवाळणी टाकायला सुरुवात केली. उशिरा अर्ज करणार्या लाडक्या बहिणींचा अर्ज पण सरकारने स्वीकारला आणि त्यांनाही दरमहा ओवाळणी सुरू केली. शासकीय प्रक्रिया ही कागदपत्रे पाहून केली जाते. या लाडक्या बहिणींच्या अर्जासोबत सुमारे १४ हजार २९८ पुरुषांनीही अर्ज केले आणि योजनेचा लाभ घेतला. ही सर्व प्रक्रिया त्यांनी कशी केली असेल, त्यांना काय अडथळे आले असतील, त्यावर त्यांनी कशी मात केली असेल, याचा खरे तर सखोल अभ्यास व्हायला हवा. या लाडक्या भावांचे चुकीचे अर्ज मंजूर करणार्या लाडक्या कर्मचार्यांची पण सखोल चौकशी झाली पाहिजे असे वाटते. या लाडक्या भावांच्या गर्दीत हे हजारो दुसरेच भाऊ बहिणींच्या नावाने शिरले. आता महिन्याला पैसे मिळत असल्याने लाडकी बहीण पण खूश असते आणि लाडके भाऊ पण खूश असतात. महिलांच्या योजनांचा लाभ पुरुषांना होत आहे हे दिसून येताच मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात भूमिका स्पष्ट केली आहे. इथे पण त्यांनी पुन्हा बहिणींना झुकते माप दिले आहे. चुकीच्या पद्धतीने ज्या लाडक्या बहिणींनी लाभ घेतले, त्यांच्याकडून वसुली केली जाणार नाही; मात्र महिलांचे पैसे पुरुषांनी घेतले असतील तर त्यांच्याकडून पैसे वसूल केले पाहिजे.सर्व प्रकारची शासकीय कागदपत्रे सादर करून आपण बहीण आहोत असे सिद्ध करणारे हे भाऊ तर बुद्धिमान असेच म्हणावे लागतील. पूर्वी नाटकांमध्ये महिला काम करत नसत तेव्हा पुरुष पात्र महिलांच्या साड्या आणि शृंगार करून स्त्री पात्र उभे करत असत. बालगंधर्व हे नटश्रेष्ठ यासाठी इतके प्रसिद्ध होते की, त्यांनी केलेल्या फॅशनचे अनुकरण त्या काळातील महिला करत असत. असाच काहीसा भपका तयार करीत १४ हजार पेक्षा जास्त लाडक्या भावांनी शासनाच्या गल्ल्यामध्ये हात घातला आहे.

शासकीय योजनेचा पद्धतशीर अभ्यास करून, स्वतःला स्त्रीरूपात आणून त्याप्रमाणे कागदपत्रे तयार करून, महिलांसाठीच्या योजनांचा लाभ घेणारे पुरुष आपल्या राज्याबाहेर कुठे असतील असे वाटत नाही. इतकी बुद्धिमत्ता इतर राज्यांमध्ये कुठून असणार? त्यांची नावे जाहीर करून त्यांचा सन्मान केला पाहिजे. कारण हा त्यांचा नव्हे तर त्यांच्या बुद्धिमत्तेचा सन्मान असणार आहे हे निश्चित.

# राज्यात होणार कृत्रिम वाळू धोरणाची अंमलबजावणी; कार्यपद्धती निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० नागपूर**

महसूल विभागाने कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कार्यपद्धती निश्चित केली असून, मंगळवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला.

नद्यांच्या पर्यावरणीय समतोलासाठी नैसर्गिक वाळूला पर्याय म्हणून एम-सँड विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी हे धोरण महत्त्वाचे असून, धोरणाची



> पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टिकोनातून भविष्यात नद्यांमधून वाळूचे उत्खनन पूर्णपणे थांबविण्याचा प्रयत्न आहे. बांधकामांसाठीही वाळू उपलब्ध होणे आणि वाळूची चोरटी वाहतूक थांबविणे महत्त्वाचे आहे.
> **- चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री**

अंमलबजावणी कशी करावी, याबाबत स्थानिक यंत्रणेस सूचना देण्यासाठी ही कार्यपद्धती आहे.

या निर्णयानुसार, सार्वजनिक तसेच खासगी जमिनींवर एम-सँड युनिट्स सुरू करण्यासाठी माहिती एकत्रित करुन 'महाखनिज' प्रणालीवर लिलावासाठी योग्य जमिनींची माहिती देण्यात येईल. पाच एकरांपर्यंतच्या क्षेत्रासाठी लिलाव प्रक्रिया राबविली जाणार आहे. एम-सँड युनिट बसवण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्रही घेतले जाईल. अवैध उत्खननात किंवा वाहतुकीत दोषी आढळलेल्या व्यक्ती किंवा संस्थांना लिलावात भाग घेता येणार नाही. पूर्वी अस्तित्वात असलेल्या खाणपट्ट्यांच्या धारकांनाही १०० टक्के एम-सँड उत्पादन करण्यासाठी 'महाखनिज' प्रणालीवर अर्ज सादर करता येईल.

# रोहयोची देयके अदा करण्यासाठी उपाययोजना कराव्यात-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती-**

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतून कुशल आणि अकुशल अंतर्गत विविध कामे घेण्यात येतात. यात अकुशलचा निधीचा प्राप्त राहत असल्याने यातून मजूरांची देयके अदा करावीत, देयके अदा करण्यासाठी पोस्ट पेमेंट बँकेचे खाते उघडण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात मनरेगा अंतर्गत सर्व यंत्रणांची कामकाजविषयक आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, उपवनसंरक्षक सुमितकुमार, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांच्यासह तहसिलदार आणि गटविकास अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, मनरेगामध्ये मस्टर देण्याचे अधिकार रोजगार सेवकांकडे देऊ नये. तहसिलदार यांनी त्यांच्या आखत्यारीत हे अधिकार ठेवावेत. येत्या १ ऑगस्टपासून एक पेड माँ के नाम उपक्रम सुरू करण्यात येत आहे. त्यामुळे वृक्षलागवडीची कामे हाती घेण्यात यावी. तसेच मस्टर



दिल्यानंतर रोजगार सेवकांकडून सात दिवसांच्या आत मस्टर जमा करून घ्यावे. मस्टर जमा होत नसल्यास देयके वेळेत होऊ शकली नसल्याने जिल्ह्याची कामगिरी खालावत आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीमध्ये मस्टर जमा करून पहिली आणि दुसऱ्या स्वाक्षरीसाठी पाठविण्यात यावे. मनरेगाअंतर्गत घेण्यात आलेली कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा. मजूरांचे देयक जमा करण्यासाठी आधार सिडींग महत्वाची बाब आहे. आधार सिडींग आणि बँक खात्याला आधार जोडण्याची प्रक्रिया तातडीने करण्यात यावी. मजूरांचे खाते उघडण्यासाठी पोस्ट पेमेंट बँकेचे अधिकारी सकारात्मक आहेत. स्थानिक स्तरावर त्यांच्याशी संपर्क साधून खाते नसलेल्या मजूरांचे खाते उघडण्यात यावे. या खात्यामुळे मजूरांना अपघात विम्याचे संरक्षण मिळणार आहे. मनरेगामध्ये अकुशलचा निधी प्राप्त होतो. यात कुशलचा निधी प्राप्त झाल्याबरोबर कामे पूर्ण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

# आंबा बागेत फांदीमर होतेय, 'हे' उपाय ठरतील फायदेशीर


शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


**दि.३० विदर्भ प्रजसत्ताक**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

आंबा बागेतीलफांद्या वाळण्याची किंवा मरण्याची समस्या अनेक कारणांमुळे येऊ शकते. आंबा बागेतील फांदीमर ही एक समस्या आहे जी आंबा पिकाला बाधित करते.

याचा परिणाम म्हणून, झाडाच्या फांद्या वाळायला लागतात आणि हळू हळू पूर्ण झाड मरते. या समस्येचे नियंत्रण करण्यासाठी, प्रादुर्भावित भागावरील साल काढावी आणि त्यावर बोर्डो पेस्ट लावावी. मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्यास, फांद्या कापणे आवश्यक आहे. या




दरम्यान नेमक्या काय उपाययोजना कराव्यात, हे पाहुयात....

**आंबा बागेतील फांदेमर** - झाडावर फांदेमर रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास प्रादुर्भावग्रस्त ठिकाणची साल उभी तडकल्यासारखी दिसते. त्यामध्ये पांढरट बुरशीची वाढ झालेली दिसते.

फांदी शेंड्याकडून वाळत जाते. नवीन लागवड केलेल्या बागांमध्ये मुख्य खोडावर प्रादुर्भाव दिसून येतो.

नियंत्रणासाठी फांद्या प्रादुर्भावग्रस्त भागाच्या दोन ते तीन इंच खाली कापून नष्ट कराव्या, कापलेल्या भागावर बोर्डो पेस्ट लावावी. पावसाची उघडीप असताना १ टक्का बोर्डो मिश्रण किंवा कॉपर ऑक्झिक्लोराइड २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे खोड व फांद्या व्यवस्थित भिजतील, अशी फवारणी करावी.

**(पावसाची उघडीप असताना फवारणी करावी)**

**ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी.**




# फ्रोझन शोल्डरचा त्रास सतावतोय?

**दि.३० विदर्भ प्रजसत्ताक**

फ्रोझन शोल्डर किंवा ॲडहेसिव्ह कॅप्स्युलायटिस हा खांद्याचा एक सामान्य व दीर्घकालीन विकार आहे. यामध्ये खांद्याच्या सांध्याभोवती असलेल्या ऊतींमध्ये सूज येते, जाडसरपणा व घट्टपणा निर्माण होतो.



परिणामी, खांद्याची हालचाल अत्यंत मर्यादित होते. फ्रोझन शोल्डर या विकारामध्ये रुग्णास तीव्र वेदना, खांदा हलवण्यात अडथळा आणि दैनंदिन कामांमध्ये अडचणी जाणवतात. सुरुवातीला सौम्य वाटणारा हा त्रास हळूहळू वाढत जातो. वेदना, हालचालींचा अडथळा आणि स्नायूंचा जडसरपणा यामुळे रुग्ण हैराण होतो. सुरुवातीस हलक्याफुलक्या हालचालींमध्ये अडथळा येतो; पण नंतर दैनंदिन कामांमध्येही अडचण निर्माण होते.

**फ्रोझन शोल्डरच्या टप्प्यावार लक्षणांची वाढ :**

१. फ्रीझिंग स्टेज : या टप्प्यात हळूहळू वेदना वाढतात. संध्याकाळी किंवा रात्री वेदना अधिक जाणवतात. खांद्याची हालचाल कमी कमी होत जाते. हा टप्पा ६ आठवड्यांपासून ९ महिन्यांपर्यंत चालतो.

.२ फ्रोझन स्टेज : या टप्प्यात वेदना काहीशी कमी होते; पण खांद्याचा जडपणा खूप वाढतो. खांदा हलवणे अत्यंत कठीण होते. कपडे घालणे, केस विंचरणे, डबा उचलणे यासारख्या साध्या कामातही अडचण येते. हा टप्पा ४ ते ६ महिने टिकतो.

३. थॉईंग स्टेज : या टप्प्यात हळूहळू हालचाली पूर्ववत होतात. वेदना कमी होतात व खांद्यामधील जडसरपणा कमी होतो. पूर्ण बरे होण्यासाठी ६ महिने ते २ वर्षे लागू शकतात.

**कारणे :**

या विकारामागे ठोस कारण निश्चित नाही; मात्र काही विशिष्ट परिस्थितींमध्ये हा त्रास जास्त आढळतो. मधुमेह (डायबेटीस) : या विकाराच्या रुग्णांमध्ये फ्रोझन शोल्डरची शक्यता अधिक असते. थायरॉईड विकार : हायपोथायरॉईड किंवा हायपरथायरॉईडच्या रुग्णांमध्येही हा त्रास दिसतो. याशिवाय हृदयरोग व पार्किन्सनसारखे आजार असल्यास शस्त्रक्रिया किंवा अपघातानंतर खांद्याची हालचाल कमी झाल्यास ही समस्या अधिक जाणवण्याची शक्यता असते. महिलांमध्ये विशेषतः ४० ते ६० वयोगटात फ्रोझन शोल्डरची समस्या जाणवण्याची शक्यता अधिक असते.

# धनादेशाचे आ. प्रताप अडसड यांच्या हस्ते वाटप

## संदीप सोळंके यांच्या प्रयत्नांना यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०चांदूर रेल्वे**

चांदूर रेल्वे शहरालगत असलेल्या सावंगा (बुजरूग) येथे घरकुल घरबांधणी अनुदान धनादेशाचे वाटप आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते करण्यात आले. या धनादेश वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावातील जेष्ठ नागरिक सुरेश चंपतराव सोळंके होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून ज्ञानेश्वर जैन्द्रे यांची उपस्थिती होती.

सावंगा (बु.) हे गाव बेंबळा नदी प्रकल्प, यवतमाळ मध्ये बाधित झाले असून या गावाचे पुनर्वसन चांदूर रेल्वे रेल्वे स्टेशन लगत सन २००७ मध्ये झालेले आहे. सावंगायेथीलबरेच लाभार्थी घरकुल घरबांधणी अनुदानापासून वंचित राहिले होते. शासनाच्या नियमानुसार प्रत्येक गावामध्ये घरबांधणी अनुदानाची रक्कम मिळालेली होती. परंतु सावंगा



(बु.)येथील ४० ते ५० लाभार्थी या अनुदानापासून वंचित राहिले होते. तेव्हा गावातील सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपा जिल्हा सचिव संदीप सोळके यांनी सदर समस्या आ. प्रताप अडसड यांच्याकडे रेटून धरली आणि आ. अडसड यांनी या प्रकरणामध्ये जातीने लक्ष देऊनहाप्रश्न मार्गी लावला. यानंतर गावामध्ये यावेळी आमदार अडसड यांच्या हस्ते सदर धनादेशाचे वाटप करण्यात आले. तेव्हा गावातीललाभार्थीयांनी आ. प्रताप अडसड तसेच संदीप सोळक यांचे आभार मानले. यावेळी गावातील युवा कार्यकर्ते विलास इरतकर, गजानन डूबे, वैभव सोळके, शयाम मारोटकर, वैभव गिलबिले, अमर बळी, देवेंद्र चचाने, अभिषेक पुनसे, संगीत मेटकर, निलेश सोळंके, अनिल तायवाडे, उमेश सोळके, अतुल भाष्कर सोळके, अनिल मेटकर व इतरांची उपस्थिती होती.

# अ.भा.ग्रा. पत्रकार संघाचे १ ऑगस्ट ते १५ ऑगस्टपर्यंत राज्यभरात विविध उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०चांदूर रेल्वे -**

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाने संघटनेचे केंद्रीय व राज्य पदाधिकाऱ्यांचे वाढदिवसाच्या निमित्याने राज्यभरात १ ऑगस्ट पासून १५ ऑगस्टपर्यंत विविध उपक्रमांचे आयोजन केलेले आहे. याच उपक्रमाचे नियोजनातून संघटनेने १ ला टप्पा मध्ये केंद्रीय संपर्कप्रमुख प्रा. रवींद्र मेंढे, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख, कार्यालय प्रमुख बाबाराव खडसे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात वृक्षारोपण व विविध उपक्रम राबविलेले आहे. पत्रकारांनी जनसामान्यांच्या समस्या सोडवित असतांना सामाजिक उपक्रम राबवावे असे पत्रकार संघाने धोरण ठरविल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व जिल्हा अध्यक्ष यांनी जिल्हा बैठक घेऊन आपल्या जिल्ह्यातील कार्यकारिणी, नुतनीकरण तसेच जिल्हा, तालुका स्तरावर वृक्षारोपण, रोगनिदान शिबिर, पत्रकार मेळावा, शालेय साहित्य वाटप आदी उपक्रम राबवावे असे ठरविण्यात आलेले आहे. ३ ऑगस्टला संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने यांचा वाढदिवस असल्यामुळे या दिवशी पत्रकार सहकारी पतसंस्था शिरजगाव कसबा मध्ये दुपारी २ वाजता पत्रकार संवाद मेळावाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमात उत्कृष्ट संघटन कौशल्यामुळे प्रदेश अध्यक्ष कैलसबापू देशमुख यांचा कार्य गौरव सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला अमरावती जिल्ह्यातील पत्रकार व केंद्रीय कार्यकारिणी हजर राहणार आहे. याशिवाय १५ ऑगस्टला संघटनेचे केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान यासीन खान यांचा वाढदिवस असल्यामुळे पंधरवडा उपक्रमाचा समारोप यानंतर होणार आहे. त्यामध्ये उत्कृष्ट कार्य केलेल्या पत्रकारांचा सत्कार करण्यात येणार आहे.

संघटनेच्या प्रत्येक जिल्हाध्यक्षांनी आपल्या जिल्ह्यात, तालुक्यात पंधरवाडा मध्ये ठरविलेले कार्यक्रम राबवावे व तसा अहवाल केंद्रीय कार्यकारणीला पाठवावा असे आवाहन अ.भा.ग्रा. पत्रकार संघाचे केंद्रीय महासचिव सुरेश सवळे, केंद्रीय सचिव अशोक पवार, केंद्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे व प्रदिप जोशी, केंद्रीय कार्यालय प्रमुख बाबाराव खडसे, केंद्रीय संपर्क प्रमुख प्रा. रवींद्र मेंढे, केंद्रीय सदस्य बाळासाहेब सोरगिवकर, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस राजेंद्र ठाकरे यांनी पत्रातून केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा
# विदर्भ प्रजासत्ताक
बुधवार दि. ३० जुलै २०२५
शहर/ग्रामिण

# भाजप आमदार केवलराम काळे यांच्या
# आश्रम शाळेतील पाण्याची टाकी कोसळली
## विद्यार्थिनीचा मृत्यू, ४ जखमी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०चिखलदरा–** चिखलदरा तालुक्यातील नागापूर येथील आदिवासी आश्रम शाळेतील पाण्याची टाकी कोसळली. या अपघातामध्ये एका १४ वर्षीय विद्यार्थिनीचा करुण अंत, तर ५ विद्यार्थिनी गंभीर जखमी झाल्या आहेत. मंगळवार २९ जुलै रोजी ही घटना घडली. या धक्कादायक घटनेमुळे मेळघाटसह संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. सुमराती सोमा जामुनकार (वय १४ वर्ष, वर्ग ८ वा) असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. जखमी चार विद्यार्थिनीवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती जिल्ह्याच्या चिखलदरा तालुक्यातील नागापूर गावातवसंतराव नाईक आदिवासी आश्रमशाळा आहे. या आश्रम शाळेची पाण्याची टाकी जिर्णावस्थेत होती. मंगळवारला ही पाण्याची टाकी कोसळून मोठी दुर्घटना घडली. यामध्ये आश्रमशाळेतील ८ व्या वर्गात शिकणारी विद्यार्थिनी सुमराती सोमा जामुनकर (१४) या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. तर अन्य चार विद्यार्थिनी गंभीर जखमी झाल्यात. सर्व जखमी विद्यार्थिनींना अचलपूर येथील खासगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. ही आश्रम शाळा भाजपचे आमदार केवलराम काळे यांची आहे. शाळेची पाण्याची

### चिखलदरा तालुक्यातील नागापुरमध्ये धक्कादायक घटना

टाकी कोसळून एका १४ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला, तर ४ विद्यार्थिनी जखमी झाल्या. अमरावती विभागाचे आदिवासी अप्पर आयुक्त जितेंद्र चौधरी यांनी या घटनेबाबत प्रसारमाध्यमांना माहिती दिली आहे. या प्रकारामुळे आदिवासी आश्रम शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ होत असल्याचे म्हटले जात आहे.–

# शिवराज्याभिषेक दिन देशातील सर्वात मोठा उत्सव
## संभाजी भिडे यांचा कार्यकर्त्यांसोबत संवाद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती–** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून शिवराज्याभिषेक दिवससोहळा साजरा केला नसता तर १५ ऑगस्ट, २६ जानेवारीसारखे महत्वाचे दिवस आपण मुक्तपणे साजरे करू शकलो नसतो, त्यामुळे शिवराज्याभिषेक दिनहा देशातील सर्वात मोठा सण समजला पाहिजे, असे प्रतिपादन शिवप्रतिष्ठान हिदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी केले.बडनेरा मार्गावरील जय भारत मंगलम येथे शिवप्रतिष्ठानच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना बैठकीत बोलत होते. विशेष म्हणजे भिडे गुरुजी यांच्या आगमनाची माहिती केवळ स्थानिक पदाधिकाऱ्यांनाच देण्याात आली होती.

मंगळवारी संभाजी भिडे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसोबत संवाद साधत जवळपास एक ते दीड तास चर्चा केली.छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेकदिन हा या देशाच्या इतिहासातील महत्वाचा टप्पा असून शिवराज्याभिषेक दिनामुळेच आपण स्वातंत्र्यदिन व गणराज्यदिन मुक्तपणे साजरे करू शकतो, असे प्रतिपादन भिडे यांनी बैठकीदरम्यान केल्याची माहिती शिवप्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष निशादसिह जोध यांनी दिली. याशिवाय शिवराज्याभिषेक दिनाचे महत्व तसेच युवकांची राष्टाप्रति असलेली कर्तव्ये या विषयावरसुद्दा भिडे गुरुजींनी मार्गदर्शन केल्याचे स्थानिक पदाधिकाऱ्यांनीसांगितले. दुपारी ४.३० वा. पर्यंत ही बैठक चालली त्यानंतर संभाजी भिडे हे अन्य एका बैठकीकरिता कामरगांवला रवाना झालेत. भविष्यातील आंदोलने तसेच संघटनात्मक बाबींवर याबैठकीत चर्चा झाल्याचे सांगण्यात येते.

# अमरावतीत पार्किंग, ट्राफिक सिग्नल आणि हॉकर्स झोन संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक
## शहरातील वाहतूक आणि व्यवसायिक व्यवस्थापनासाठी निर्णायक पावले उचलण्याचा निर्धार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**
अमरावती शहरातील वाढती वाहतूक कोंडी, अनधिकृत रस्ताव्यापार आणि अपुऱ्या पार्किंग व्यवस्थेवर नियंत्रण मिळवण्यासाठी आज महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली ही उच्चस्तरीय बैठक पार पडली. बैठकीचा उद्देश शहरातील वाहतूक आणि सार्वजनिक जागांचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करणे, तसेच नागरीक आणि व्यावसायिकांना योग्य सुविधा उपलब्ध करून देणे हा होता. या बैठकीत शहरातील पार्किंग झोन, ट्राफिक सिग्नलच्या व्यवस्थापना बरोबर च हॉकर्स झोनसंदर्भात नियोजनबद्ध उपाययोजनांवर विस्तृत चर्चा झाली. आयुक्त चांडक यांनी स्पष्टपणे सांगितले की, शहरातील पार्किंग व्यवस्था ही वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. नागरीकांना सुटसुटीत आणि सोयीस्कर पार्किंग उपलब्ध करून देणे, हे शहर व्यवस्थापनाचे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी शहरवासीयांना सहभागी करून घेत नागरी व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याचा निर्धार व्यक्त केला. जनजागृती मोहिमा,



नागरिक आणि व्यावसायिक यांच्यात संवाद, तसेच कार्यक्षम नियोजनाच्या जोरावर अमरावतीत शिस्तबद्ध आणि नागरीकाभिमुख व्यवस्था उभारण्याचे संकेत त्यांनी दिले.या बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, शिल्पा नाईक, पोलीस उपायुक्त शाम घुगे, गणेश शिंदे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, डॉ. मेघना वासनकर, वाहतूक निरीक्षक प्रविण वांगे, ज्योती विल्लेकर आदींसह सार्वजनिक बांधकाम विभागाचे तुषार काळे, प्रकाश उमाळे आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**पार्किंग व्यवस्थापनात बदलांचे संकेत:** मुख्य रस्ते, बाजारपेठा व गर्दीच्या ठिकाणी पार्किंगसाठी 'पेड' आणि 'मोफत' झोन निश्चित करण्यात येणार.

**'विकली व मंथली पास' सुविधा सुरू करण्याचा प्रस्ताव.–** सार्वजनिक बांधकाम विभाग, वाहतूक विभाग यांचा समन्वय ठेवून जागा निश्चितीचे आदेश.

**हॉकर्स झोनसाठी नियोजनबद्ध अंमल बजावणी:–** रस्त्यावरील अनधिकृत व्यवसायांमुळे निर्माण होणाऱ्या अडथळ्यांवर उपाययोजना करण्यासाठी नियोजित हॉकर्स झोन तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.आयुक्त म्हणाल्या, अशा व्यवसायिकांसाठी सुविधा–संपन्न जागा उपलब्ध करून दिल्यास, नागरीकांच्या सुरक्षिततेसह व्यवसायही सुरळीत राहील.

हॉकर्सना विस्थापित न करता, पर्याय तयार करण्यावर भर.– महापालिका व वाहतूक पोलीस यांच्या संयुक्त कृती आराखड्याची अंमलबजावणी. नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाईचे निर्देश.

**टोईंग व्हॅन व दंडात्मक कारवाईचा निर्णय:**अनधिकृत पार्किंग रोखण्यासाठी टोईंग व्हॅनचा प्रभावी वापर होणार. ठराविक ठिकाणी दंडात्मक कारवाईत वाढ करण्यात येणार.

# ब्लॅक शमशेरच्या घरातून तलवार, सत्तर फरशा जप्त
## ४ हजार ९०० रूपयांचा मद्देमाल जप्त, अकबर नगरात नागपरीगेट पोलिसांनी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती–** नागपुरी गेट पोलिसांनी अकबर नगरातील एका कुख्यात आरोपीच्या घरातून २ तलवार, ३ सत्तुर व १ फरशासारखे घातक शस्त्र जप्त केले. जप्त केलेल्या शस्त्राची किमत ४ हजार ९०० रूपये आहे. याबाबत पोलिसांनी आरोपीवर नागपुरीगेट पोलिस ठाण्यात आर्म्स ॲक्टनुसार गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.फारुख उर्फ ब्लॅक शमशेर



खान (३२) रा. अकबर नगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, नागपुरीगेट पोलिस ठाण्याचे ठाणेदार पीआय हनमंत उरलागोंडावर हे डीबीस्कॉडसह ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना त्यांना अकबर नगरातील फारूख खानच्या घरात मोठया प्रमाणात अवैध घातक शस्त्रसाठा असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पीआय उरलागोंडावर यांनी डीबीस्कॉडचे प्रमुख पीएसआय गजानन विधाते, एएसआय उपनिरीक्षक अहमद अली, संतोष यादव, दानिश शेख, राहुल रोडे, सागर पंडित, चालक आकाश कांबळे यांच्यासह मिळून तात्काळ फारूख खानच्या घरावर छाड टाकली. पोलिसांनी शमशेर खान याच्या घराची झडती घेतली असता पलंगाच्या आतील भागातलपवलेला अवैध शस्त्रसाठा आढळून आला. यात २ तलवारी, ३ सत्तूर व १ फरसा मिळून आला असून, याची एकूण किंमत अंदाजे ४,९०० रुपये इतकी आहे. सर्व शस्त्रे पोलिसांनी पंचासमक्ष जप्त केली.

# आनंद काळे यांच्या अपात्रतेवर ६ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार
## जिल्हा मध्यवर्ती बँक येथील प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३०अमरावती –** अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेला दंडाची नोटीस बजाविल्याचे प्रकरण आदेशा करिता न्यायालयाने क्लोज केले असले तरी विभागीय सहनिबंधकांना न्यायालयाकडून कुठलेच आदेश नसल्याने या कार्यालयाने या प्रकरणात ६ ऑगस्टची तारीख दिली आहे. याशिवाय आनंद काळे यांच्या



अपात्रतेबाबत देखील त्याच दिवशी सुनावणी होणार आहे. विरोधकांनी सत्ताधाऱ्यांविरोधात केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक कार्यालयाने चौकशी समितीची स्थापना केली होती. या समितीसाठी जिल्हा बँकेने आवश्यक कागदपत्रे न पुरविल्यामुळे बँकेला नोटीस बजावण्यात आली होती. तसेच, कागदपत्रे सादर करेपर्यंत दंडठोठावण्यात आला होता. बँकेने मात्र याविरोधात न्यायालयात धाव घेतली होती. यासंदर्भात दोन वेळा सुनावण्या पार पडल्या असून, २२ जुलै रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने सदर प्रकरण प्राथमिक स्वरूपात आदेशासाठी बंद केल्याचे स्पष्ट केले आहे. परंतु यासंदर्भात विभागीय सहनिबंधकांना न्यायालयाने याबाबत कुठलेच आदेश न दिल्याने त्यांच्यास्तरावर आता नोटीसचे प्रकरण सुरू असून यावर ६ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे. याशिवाय बँकेचे संचालक आनंद काळे यांच्यावर विविध प्रकरणांमध्ये अनियमितता केल्याचा आरोप ठेवत त्यांना अपात्र ठरविण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. यावर मंगळवारी सुनावणी पार पडली. सुनावणी दरम्यान त्यांनी काही कागदपत्रे सादर केली असून याकरिता वकीलांची नियुक्तीची परवानगी मागितली आहे. त्यामुळे त्यांना देखील ६ ऑगस्टची तारीख देण्यात आली आह

# महापालिकेने बजावल्या १६०० जणांना नोटीस
## ४६ जणांचे अर्ज, आरोग्य परवाना काढण्यास व्यावसायिकांचा विरोध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती–** मनपा क्षेत्रातील नागरिकांच्या आरोग्याशीसंबंधित सर्व आस्थापनांना मनपा आरोग्य विभागाची नाहरकत (एनओसी) घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. केंद्र शासनाने तसा आदेशही दिला. त्यानुसार मनपाने बाजार परवाना विभागात नोंदणीकृत एक हजार ६०० आस्थापनांना नोटीस बजावली आहे, तर दुसरीकडे महापालिका क्षेत्रातील व्यापाऱ्यांनी स्वतंत्ररीत्या आरोग्यविषयक परवाना काढण्यास विरोध दर्शविला आहे. महापालिकेकडून आवश्यक ते सर्व परवाने शुल्क भरून काढले असताना पुन्हा या परवान्यासाठी नोटीस का बजावता ? असा व्यापाऱ्यांचा प्रश्न असून १६०० पैकी ४६ जणांनी एनओसीकरिता कागदपत्रे सादर केली आहे.

केंद्र सरकारने महापालिका क्षेत्रातील सर्व आस्थापनांना आरोग्य विभागाच्या एनओसी घेण्याचा निर्णय बंधनकारक केला आहे. त्यानुसार मनपा क्षेत्रातील हॉटेल, लॉजिंग, दूध डेअरी, किराणा दुकान, पॅथॉलॉजी लॅब, मेडिकल स्टोअर्स, वाईन शॉप, बिअर शॉप, ब्युटी पार्लर, बार–रेस्टॉरंट, मंगल कार्यालय आदी आस्थापना चालकांनी त्यांच्या दुकानातील कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करावी. तेथील पाण्याची तपासणी करावीतसेच नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करणाऱ्या वस्तू विक्रीच्या अनुषंगाने एनओसी प्राप्त करून घ्यावी, असा सूचना आरोग्य विभागाने दिलेल्या आहेत. महापालिकेच्या आरोग्य विभागाने खाद्यपेय विक्री करणाऱ्यांसह रेस्टॉरंट, औषध आणि वाईन विक्रेत्यांना नोटीस पाठविल्या असून सात दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. सात



दिवसांच्या आत नाहरकत प्रमाणपत्र न घेतल्यास त्याचा बाजार परवाना रद्द केला जाईल, असे बजावले आहे. विक्रेत्यांनी बाजार व परवाना विभागाकडून विविध प्रकारचे आवश्यक ते सर्व परवाने घेतले असताना आता या नवीन परवान्याची काय गरज? असा सवाल उपस्थित करून महानगर चेंबरने तीव्र विरोध दर्शविला आहे.

चेंबरचे अध्यक्ष सुरेश जैन यांच्या नेतृत्वात चेंबरच्या पदाधिकारी व सदस्यांनी आयुक्त सौम्या शर्मा यांची भेट घेत महापालिका अनेक वर्षांपासून अमरावतीच्या व्यापाऱ्यांना बाजार परवाने देत आहे. व्यापारी अन्न, औषधे आणि वाईनसाठी वेगळे परवाने घेत आहेत. मग हा नवीन परवाना कशासाठी? असा सवाल करीत हा प्रशासकीय ठराव रद्द करण्याची मागणी केली. व्यावसायिकांच्या नुसार आस्थापना सुरू करण्यासाठी आवश्यक व इतर सर्व प्रमाणपत्र आधीच घेतले आहे, असे सांगत एनओसीला विरोध दर्शविला तर दुसरीकडे जर व्यवसायिकांकडे कागदपत्रे असतील तर त्यांना ते देण्यासाठी आक्षेप का, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.दरम्यान, महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी सांगितले की, हा केंद्राचा नियम असून त्यानुसार प्रशासकीय प्रस्ताव पारित करण्यात आला आहे. त्याची अमलबजावणी करण्यात येत असून मनपाच्या बाजार व परवाना विभागाकडे नोंद असलेल्या १६०० व्यापाऱ्यांना नोटीसेस देण्यात आल्या आहेत. यातील ४६ जणांनी परवान्यासाठी कागदपत्रे जमा केली आहेत. पाचशे रुपये शुल्क यासाठी आकारण्यात येणार आहे

# पोस्टाचे सॉफ्टवेअर अपडेट करणे ठरतेय लाडक्या बहिणींसाठी डोकेदुखी

## डाकघरात कराव्या लागतात येरझारा संकेतस्थळ आनलाईन प्रक्रियेला अडथळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती :**
रक्षाबंधन हा सण अकरा दिवसावर येऊन ठेपला असतानाच डाक विभागाने सॉफ्टवेअर अपडेट केले, त्याची डोकेदुखी मात्र आता लाडक्या बहिणींना सहन करावी लागत आहे. भावासाठी राख्या पाठवण्याकरीता महिला पोस्टात पोहोचतात तेव्हा मात्र त्यांना रित्या हाताने परतावे लागत आहे. स्पीड पोस्ट करायचे असले तरी पोर्टल स्लो असल्याने गतिमान होणारे काम हे खूपच थंडावले आहे.

भाऊ आणि बहिणीच्या प्रेमळ - नात्याचे प्रतीक असलेला रक्षाबंधन - हा सण ९ ऑगस्ट रोजी उत्साहात - साजरा केला जाणार आहे. या सणाला फक्त ११ दिवस उरले आहेत. अशा काळात भारतीय टपाल सेवा विभागाने आपल्या कामाचा वेग वाढवण्यासाठी अलीकडेच सॉफ्टवेअर अपडेट केले आहे. टपाल विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या नवीन सॉफ्टवेअरवर काम करण्याचे फक्त ३ते ४ दिवस पूर्ण केले आहेत. अशा परिस्थितीत, नवीन तंत्रज्ञानाकडे कर्मचाऱ्यांचा अपूर्ण असलेला सराव ग्राहकांसाठी अडचणीचे कारण बनू लागला आहे. राखीच्या हंगामात टपाल विभाग अपडेट करण्याच्या या प्रक्रियेमुळे बहिणींच्या चेहऱ्यावर चिंतेचे भाव आले आहेत.केंद्र सरकारने प्रशासकीय यंत्रणेची तांत्रिक व्यवस्था अधिक सक्रिय करण्यासाठी त्यात सुधारणा करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे विविध विभागांची




तांत्रिक यंत्रणा अपडेट केली जात आहे. या अपग्रेडचा उद्देश भारतीय टपाल विभागाकडून पुरवल्या जाणाऱ्या सेवांची कार्यक्षमता, सुरक्षा आणि एकूण गुणवत्ता सुधारणे आहे. त्याच मालिकेत, जुलैत भारतीय टपाल विभागाचे सॉफ्टवेअर देखील अपडेट करण्यात आले. देशातील राज्यांमध्ये हे अपडेटजूनमध्ये तर महाराष्ट्रात जुलैत पूर्ण झाले. त्यामुळे शहर आणि जिल्ह्यातील सर्व टपाल विभागाच्या शाखांचे काम १७ ते २६ जुलैपर्यंत बंद होते. विशेषतः आर्थिक व्यवहारांशी संबंधित सर्व प्रकारचे व्यवहार काही दिवस बंद राहिले. आता सॉफ्टवेअर अपडेटचे काम पूर्ण झाले आहे. यासोबतच हे सॉफ्टवेअर वापरणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ही याची माहिती देण्यात आली आहे. त्यानंतर टपाल विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी रविवार, २७ जुलै रोजी प्रायोगिक तत्त्वावर आणि सोमवार, २८ जुलै पासून नियमितपणे काम सुरू केले.

### ३ दिवसांपासून समस्या

अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ॲडव्हान्स्ड पोस्टल टेक्नॉलॉजी २.० हे नवीन सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन वापरण्यास सुरुवात करून फक्त दोन ते तीन दिवस झाले आहेत. कर्मचाऱ्यांना नवीन तंत्रज्ञान शिकण्यासाठी आणि त्यात काम करण्यासाठी किमान १ ते ६ महिने लागतात. परंतु सॉफ्टवेअर अपडेट अशा वेळी झाले आहे. जेव्हा रक्षाबंधन हा टपाल विभागासाठी महत्त्वाचा काळ असतो. त्यातून विभागाला अपेक्षेपेक्षा जास्त उत्पन्न मिळते. अशा परिस्थितीत सॉफ्टवेअर अपडेटिंगमुळे कामकाजात समस्या निर्माण होत आहेत.

# सरकारी शाळांचे १५ दिवसात स्ट्रक्चरल ऑडिट करा

## डॉ. अलिम पटेल यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

***विदर्भ प्रजासत्ताक***
***दि. ३०अमरावती***
नगरपरिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका शाळांचे १५ दिवसात स्ट्रक्चरल ऑडिट करावे आणि योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी डॉ. अलिम पटेल यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली.

राजस्थानातील झालावाड जिल्ह्यात आहे. होण्याची दाट शक्यता शाळांच्या पिपलोदी सरकारी इमारतींची जीर्णावस्था वि शाळा कोसळून सात झाली आहे. पायाभूत विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू सुविधांची कमतरता आणि ३२ विद्यार्थी जिल्हा परिषद जुन्या जिल्ह्यातील सरकारी शाळांची दूरवस्था पाहून इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. राजस्थानातील घटनेचीहोण्याची दाट शक्यता आहे. शाळांच्या इमारतींची जीर्णावस्था झाली आहे. पायाभूत सुविधांची कमतरता जिल्हा परिषद जुन्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. पुनरावृत्ती वर्गखोल्यांची कमतरता असल्यामुळे विद्याध्यर्थ्यांना घोकादायक परिस्थितीत शिक्षण घ्यावे लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

### स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था

शौचालय आणि स्वच्छतागृहे अस्वच्छ आणि वापरण्यायोग्य नसतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य घोक्यात येते. प्रशासकीय दुर्लक्ष शिक्षण विभाग संबंधित प्रशासकीय यंत्रणांकडून या समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते, उपाययोजना वेळेवर होत नसल्याचा आरोप निवेदनात केला आहे.



निवेदन देताना माजी लेफ्टनंट कमांडर डॉ. अलिम पटेल, किरण गुडघे, असराल कुरेशी, जावेद, अन्सार बेग, संजय गडलिंग, हाफीज एहफाज खान, हाफीज शारीक, अर्शद पठाण, सैय्यद आसिफ, मोहम्मद तस्सन्दुर, ॲड. शमाईल खान, अब्दुल रहीम राही, कलीम खान, कदीर कुरेशी, इस्माईल राराणी, दाऊद शहा, नईम रेहबर, सय्यद नसिम आणि एजाज अहमद आदी अनेक युनायटेड फोरमचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# १४ ऑगस्टपूर्वी अतिवृष्टीमुळे पडलेल्या घरांची नुकसान भरपाई द्या

## अन्यथा स्वातंत्र्यदिनी उपोषणाला बसु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० चांदूर रेल्वे–**
मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीत चांदूर रेल्वे शहरातील डांगरीपुऱ्यातील एक घर कोसळल्याने एकाचा मृत्यु झाला होता तर यावर्षी ८ जुलै रोजी झालेल्या संततधार पावसामुळे एका वृध्द महिलेचे घर कोसळुन मोठे नुकसान झाले. या दोन्ही घटनेचा पंचनामा तलाठ्याने करून अहवाल पाठविल्यानंतर नुकसान भरपाई मिळेल असे सांगीतले होते. मात्र अद्याप पर्यंत त्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही. त्यामुळे येत्या १४ ऑगस्ट पर्यंत नुकसान भरपाई द्या; अन्यथा स्वातंत्र्यदिनापासून स्थानिक तहसिल कार्यालयासमोर उपोषणाला बसु अशा इशारा अतिवृष्टीग्रस्तांसह माजी नगरसेवकांनी तहसिलदार,मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.चांदूर रेल्वे येथील डांगरीपुऱ्यात शबाना सलमान पठाण यांचे घर आहे. त्यांचा घरी त्यांचे वडील तुराब शेख गुलाब (वय ८०) व आई अली शेख बिन शेख (वय ७०) पाहुणपणाला आले असतांना ३ ते ५ सप्टेंबर २०२४ दरम्यान



**अतिवृष्टीग्रस्तासह माजी नगरसेवकांचे तहसिलदार,मुख्याधिकारी यांना निवेदन**

सतत तीन दिवस अतिवृष्टी झाल्यामुळे त्यांच्या घराची भिंत कोसळली .त्यामध्ये त्यांचे वडील तुराब शेख गुलाब यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेचा पंचनामा पटवारी यांनी केला होता. परंतु अजूनपर्यंत त्यांना कुठलीही मदत मिळालेली नाही. माजी आमदार वीरेंद्र जगताप, माजी नगराध्यक्ष निलेश सूर्यवंशी व हर्षल वाघ यांनी भेट देऊन पाहणी केली व अतिवृष्टीग्रस्तधारकांना तात्काळ आर्थिक मदत केली होती. आता ७ व ८ जुलै रोजी झालेल्या संततधार पावसामुळे डांगरीपुरा येथील मुक्ताबाई भिमराव मरसकोल्हे यांचे ८ जुलैच्या रात्री सुमारे एक वाजता घरांच्या दोन भिंत कोसळली,सुदैवाने यात जीवितहानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणात अत्यावश्यक वस्तु, कपडे व अन्य वस्तुंचे नुकसान झालं. सदर पंचनामा ९ जुलै रोजी तलाठी यांनी केला.परंतु अजून पर्यंत त्यांना कुठली आर्थिक मदत मिळालेली नाही.त्यामुळे अतिवृष्टीग्रस्तधारकांच्या निवेदनाची दखल १४ ऑगस्ट पर्यंत घेतली नाही तर स्वातंत्र्यदिनी तहसिल कार्यालयासमोर उपोषणाला बसु असा इशारा माजी नगरसेविका शारदा मेश्राम, सुमेध सरदार, नरेंद्र मेश्राम, नरेश शेंडे, अतिवृष्टीग्रस्तधारक मुक्ताबाई मरसकोल्हे, शबाना पठाण यांनी दिला आहे.

# 'इंद्रशेष दरबार'च्या नागपंचमी महोत्सवात हरिनामाचा गजर

## वडाळी परिसरातील मंदिरात दर्शनासाठी भाविकांची रांग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती–**
वडाळी परिसरात इंद्रशेष दरबार संस्थानच्या वतीने मंगळवारी आयोजित नागपंचमी महोत्सवात उपस्थित भाविकांनी हरिनामाचा गजर केला. नागपंचमीनिमित्त सकाळपासूनच मंदिरात दर्शनासाठी शेकडो भाविकांची रांग लागल्याचे दिसून आले. मंदिरात प्रथम महाआरती नंतर पालखी सोहळ्याला प्रारंभ झाला.

अमरावती जिल्ह्यासह विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून आलेली भजनी मंडळी, वारकरी संप्रदायाची दिंडी पालखी सोहळ्यात सहभागी झाली होती. आबाल वृद्धांपर्यंतचा उत्साह दिसून आला. दिंडी सोहळ्यानंतर दुपारपासून पुन्हा मंदिरात दर्शनासाठी गर्दी कायम होती. सकाळपासूनच आलेल्या विविध भजनी मंडळांनी, महिला भजनी मंडळांनी आपले सादरीकरण केले. पाचही दिवस कैलास महाराज यांचे शिवमहापुराण कथा पारायण,




सायंकाळी हरिपाठ व महाआरती, असे धार्मिक कार्यक्रम सुरू होते. मंगळवारी इंद्रशेष भजन मंडळ काजळसरा येथील दीपक पाटील व त्यांचा संच त्यापाठोपाठ वर्धा येथील नरेश खंडाळकर, दामोदर राऊत यांच्या संचाचे सादरीकरण झाले. रात्री वारकरी हरिपाठ व महाआरती झाली. बुधवार, ३० जुलैला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दिव्यांग व गोरगरिबांना वस्त्रदानही केले जाईल. बुधवार रात्री ८ वाजता 'स्वर भक्तीचे' हा स्वरा ईश्वरकर, राहुल तायडे व राजकुमार निंबोकार यांच्या भजनाचे सादरीकरण झाले. या वेळी महाप्रसादासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# तरुणीवर तिघांकडून लैंगिक अत्याचार

## मुख्य आरोपीला अटक, दोघांची बालसुधारगृहात रवानगी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०दर्यापूर–** दर्यापूर तालुक्यातील खोलापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत एक अत्यंत संतापजनक घटना घडली असून, एका १९ वर्षीय तरुणीवर अत्याचार करण्यात आल्याची तक्रार पोलिसांत दाखल झाली आहे. या प्रकरणात पोलिसांनी एक २० वर्षीय युवक अटक केला असून, दोन विधीसंघर्षित बालकांची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना २५ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास घडली. पीडित तरुणी काही सामान खरेदीसाठी गावातील स्टेशनरी दुकानात गेली होती. परत येताना आरोपी विकास विलास मोरे (वय २०) याने तिचा हात पकडून जबरदस्तीने



स्वतःच्या घरी नेले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. पीडित तरुणीने मदतीसाठी आरडाओरडा केला, मात्र कोणतीही मदत मिळाली नाही.याच दरम्यान, तिच्या परिचयातील दोन अल्पवयीन मुलं (वय अनुक्रमे १४ व १६ वर्षे) त्या ठिकाणी पोहोचली.

त्यांनीही पीडितेचा विनयभंग केल्याचे पीडितेने तक्रारीत नमूद केले आहे. या घटनेनंतर खोलापूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, सोमवारी रात्री उशिरा पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले. प्रमुख आरोपी विकास मोरे याला अटक करण्यात आली असून, दोन्ही अल्पवयीन आरोपींची रवानगी मंगळवारी बालसुधारगृहात करण्यात आली आहे.

या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सुलभा राऊत करत आहेत.

# दोन दिवसांत ४ लाख ५० हजार लाभार्थींच्या केवायसीचे आव्हान

## ई-केवायसी नाही तर रेशन बंद; शासनाने दिले आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०यवतमाळ–** धान्य वितरणात पारदर्शकता यावी, काळ्या बाजाराला चाप बसण्याकरिता शासनाने रेशन घेणाऱ्या लाभार्थींना ई-केवायसी बंधनकारक केले आहे. मंगळवारी दि. २९ जुलै पर्यंत जिल्ह्यात २० लाख ६२ हजार ३१७ लाभार्थ्यांपैकी १६ लाख ११ हजार ३१९ लाभार्थींची ई-केवायसी पूर्ण झाली आहे. दोन दिवसात तिनही योजनेच्या ४ लाख ५० हजार ९९८ लाभार्थींची ई-केवायसी पूर्ण करण्याचे आव्हान पुरवठा विभागासमोर आहे. ज्या लाभार्थ्यांनी ई केवायसी केली नाही त्या लाभार्थ्यांचे रेशन बंद होणार आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत जिल्ह्यातील रास्तभाव धान्य दुकानांमधून अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थींना अन्नधान्याचे वितरण करण्यात येते. अंत्योदय व प्राधान्य कुटुंब कार्डधारकांना शासनाकडून गहू, तांदुळ आदी धान्य वितरीत केले जाते. मात्र, अनेकदा लाभार्थींना धान्य मिळत नसल्याची ओरड होते. शिवाय, काळ्या बाजारात धान्याची विक्री होत असल्याच्या घटनाही राज्यात समोर येत आहेत. काळ्या बाजाराला लगाम बसावा, याकरिता शासनाकडून लाभार्थींची पडताळणी सुरू केली आहे. ३१



जुलैपर्यंत सर्व लाभार्थींची ई-केवायसी करुन घेणे अनिवार्य केले आहे. त्यानुसार सर्व शिधापत्रिकाधारकांनी आधार प्रमाणीकरण ई-केवायसी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी केले आहे. गेल्या काही वर्षापासून हा विषय वारंवार येत आहे. या पूर्वी पाच वेळा मुदत दिली होती. त्यातूनही लाभार्थींची ई-केवायसी झालीच नाही. आता ई-केवायसी करण्याकरिता ठिकठिकाणी कॅम्पचे आयोजन प्रशासनाने केले आहे. तिन्ही योजनेचे लाभार्थी

लक्ष्य पूर्ण होत नसल्याने वारंवार देताहेत मुदतवाढ बहुतांश बाबतीत कुटुंब प्रमुखांचे ई-केवायसी झाले आहे. मात्र इतर सदस्यांचे राहिले आहे. नागरिकांकडून प्रतिसाद कमी, सर्व्हर डाऊन होत असल्यामुळे काम मंद गतीने सुरू आहे. यापूर्वी २०२४ मध्ये ३१ डिसेंबरपर्यंत मुदत वाढवून दिली होती. त्यानंतर ती ३१ मार्चपर्यंत वाढवली. त्यानंतर ३१ जुलैपर्यंत वाढवली आहे. यांची केवायसी राहिली राळेगाव २२४३३, केळापूर ३०१६३, दिग्रस ३२२८०, घाटंजी २७४४६, यवतमाळ ६९३९७, महागाव ३६६६९, उमरखेड ३८३५३, पुसद ५४३२०, झरी जामणी, १३९४७ नेर २०२९२, वणी २३५२८, दारव्हा ३१२७१, कळंब १५५७२, मारेगाव १२४४९, बाभुळगाव १२५४०, आर्णी २०३३८.रेशन दुकानात केवायसी करण्याची केली सोय त्यांच्या जवळच्या रास्तभाव धान्य दुकानांमध्ये प्रत्यक्ष जावून आधार कार्ड दाखवून, अंगठ्याचा ठसा देऊन आधार प्रमाणीकरण ई-केवायसी करावयाची आहे. त्यासाठी प्रत्येक दुकानात सोय करण्यात आली आहे. अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे सर्व कार्डधारकांना धान्य पोहोचले आहे.

# राजापेठ ते बडनेरा - सौंदर्यीकरणासाठी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची प्रत्यक्ष पाहणी

## आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचा शहर सौंदर्यीकरण गतिमान करण्याचा निर्धार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**



अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी शहरातील राजापेठ, फर्शीस्टॉप, दस्तुरनगर, नवाथे चौक, अलमास नगर जुनीबस्ती तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा समता चौक, शिवाजी महाराज पुतळा आठवडी बाजार, बडनेरा परिसरातील सौंदर्यीकरणाची पाहणी केली.या दौऱ्यात या महत्त्वाच्या ठिकाणांच्या सौंदर्यीकरण आणि विकास कामांचा आढावा घेण्यात आला. कामांच्या प्रगतीबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली व आवश्यक त्या सूचना दिल्या गेल्या.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी बोलतांना सांगितले की, शहराच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठिकाणांचे सौंदर्यीकरण करून त्यांना आधुनिक सुविधांसह सुसज्ज करणे, हा महानगरपालिकेचा प्रमुख उद्देश आहे. नागरिकांना स्वच्छ, सुंदर आणि अभिमानास्पद सार्वजनिक स्थळे मिळावीत यासाठी ही कामे वेळेत आणि दर्जेदाररीत्या पूर्ण केली जातील.महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध भागांत अशी सौंदर्यीकरण कामे युद्धपातळीवर सुरू असून, यामध्ये नागरिकांचे सहकार्यही अपेक्षित आहे.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी संबंधीत अधिका-यांना निर्देश दिले की, सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत. सौंदर्यीकरणासंबंधी सुरू असलेली सर्व कामे ठरवलेल्या वेळापत्रकानुसार पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित ठेकेदार व अभियंत्यांना देण्यात आले. गुणवत्तेवर कोणताही तडजोड नको. रस्ते, फूटपाथ, दिवाबत्ती, शौचालये, बागा, पुतळ्यांची रंगरंगोटी इ. बाबतीत दर्जेदार व टिकाऊ साहित्य वापरण्यावर भर द्यावा. परिसर स्वच्छ व आकर्षक ठेवावा. काम सुरू असलेल्या भागात कचरा व माती न ठेवता नियमित स्वच्छता राखण्याचे आदेश देण्यात आले. प्रत्येक ठिकाणी माहिती फलक लावावेत. नागरिकांना कामाची माहिती मिळावी यासाठी प्रत्येक सौंदर्यीकरण प्रकल्पस्थळी माहिती फलक लावावेत. स्थानीय नागरिकांचा सहभाग घ्यावा. परिसरातील नागरिक व स्थानिक संस्थांशी समन्वय साधून कामात पारदर्शकता व सहभाग सुनिश्चित करावा. दिवसा व रात्रीच्या वेळेस सुरक्षेची काळजी घ्यावी. रस्त्यावर सुरू असलेल्या कामांमुळे अपघात होऊ नयेत यासाठी योग्य संकेतक व सुरक्षाव्यवस्था ठेवण्याचे आदेश दिले. पुतळे व स्मारकांचे संवर्धन व्हावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांच्या आसपासचा परिसर सुसज्ज व भव्य ठेवावा. कामांची नियमित पाहणी केली जाईल. संबंधित अधिकारी हे कामांच्या प्रगतीचा सातत्याने आढावा घेतील, आणि आवश्यक असल्यास पुन्हा प्रत्यक्ष पाहणी केली जाईल.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नागरिकांना आवाहन केले की, अमरावती शहर हे आपल्या सर्वांचे आहे. शहरातील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणांचे सौंदर्यीकरण सुरु असून नागरिकांनीही याची काळजी घेणे गरजेचे आहे. महानगरपालिका विविध भागांमध्ये स्वच्छता, सौंदर्यीकरण आणि पायाभूत सुविधांच्या उन्नतीसाठी विविध प्रकल्प राबवत आहे. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी अमरावतीकर नागरिकांना आवाहन केले की, या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा. सार्वजनिक ठिकाणांवर स्वच्छता राखावी, वृक्षसंवर्धनात सहभागी व्हावे, तसेच सुरू असलेल्या कामांना अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. आपले सूचनांनी व सकारात्मक सहभागाने आम्हाला अजून चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. शहराच्या विकासासाठी प्रशासन व नागरिक यांच्यात समन्वय हाच यशाचा मूलमंत्र आहे. चला, आपण सगळे मिळून 'स्वच्छ, सुंदर आणि समृद्ध अमरावती' घडवूया!या पाहणी दौऱ्यात उपायुक्त नरेंद्र वानखडे, शहर अभियंता रविंद्र पवार, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे, उपअभियंता (प्रकल्प) सुहास चव्हाण, पोलीस निरीक्षक, उपअभियंता श्रीरंग तायडे, अजय विंचुरकर, मंगेश कडू, अभियंता राजेश आगरकर, शरद तिनखेडे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, शारदा गुल्हाणे, अधिकारी, कर्मचारी, परिसरातील नागरीक उपस्थित होते.

# रक्षाबंधनामुळे टपाल कार्यालयात प्रचंड गर्दी

## ग्राहकांना दोन तासांहून अधिक प्रतीक्षा करावी लागतेय; अतिरिक्त काउंटर सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

रक्षाबंधनासाठी राख्या पाठवण्याचे हक्काचे माध्यम म्हणून या दिवसांत टपाल कार्यालयांमध्ये चांगलीच गर्दी उसळली आहे. येथील श्याम चौक स्थित मुख्य टपाल कार्यालयही त्याला अपवाद ठरले नाही. येथे आज, मंगळवारी दुपारी ग्राहकांची लांबच लांब रांग लागली होती. प्रत्येक ग्राहकाला आपले पार्सल पाठविण्यासाठी किमान दोन तासांची प्रतीक्षा करावी लागली.

पुढील महिन्याच्या नऊ तारखेला रक्षाबंधन आहे. भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचे प्रतिक असलेल्या या सणाला केवळ दहाच दिवस शिल्लक राहिल्याने त्यापूर्वी आपली राखी भावापर्यंत पोहचावी, अशी प्रत्येक बहिणीची अपेक्षा आहे. त्यामुळे बहुतेक टपाल कार्यालयांमध्ये सध्या गर्दी उसळली आहे. अचानक ओढवलेल्या या गर्दीमुळे नियमित कामकाजानिमित्त येणाऱ्या ग्राहकांनाही रांगेत उभे राहून आपला नंबर केव्हा येतो, याची प्रतीक्षा करावी लागत आहे.

### मुख्यालयी एक काउंटर वाढवले

ग्राहकांची वाढती गर्दी लक्षात घेता श्याम चौकातील मुख्यालयात एक अतिरिक्त काऊंटर सुरु करण्यात आले आहे. कार्यालयाच्या दर्शनी भागात आज, मंगळवारी दुपारपासून हे नवे काऊंटर सुरु करण्यात आले आहे. याशिवाय एखाद्या ग्राहकाला मोठ्या प्रमाणात (बल्क) टपाल पाठवायचे असेल तर त्यासाठी मुख्यालयाच्या मागच्या बाजूस स्वतंत्र व्यवस्थाही करण्यात आली आहे.

**– सुजीत लांडगे, पोस्ट मास्टर,**
**मुख्य डाकघर, श्याम चौक, अमरावती.**

रजिस्टर पोस्टाने पाठवावयाची टपाल, अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींग (युपीसी), स्पीड पोस्ट, पत्रे, इतर पार्सल, मनी ऑर्डर, बचत खाते, विमा, पारपत्र, आधार अपडेशन आणि इतर वित्तीय सेवा टपाल कार्यालयामार्फत पुरवल्या जातात. त्यासाठीही ग्राहकांचा ओढा या कार्यालयाकडे असतो. परिणामी रोजच्या गर्दीत आणखी भर पडली आहे. यासंदर्भात पोस्ट मास्टरशी संपर्क केला असता दोन्ही ग्राहक एकत्रित झाल्यामुळे गर्दी वाढली, त्याचवेळी नवे सॉफ्टवेअर आणले असल्यानेही कामकाज थोडे संथ झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**ग्राहकांनी इतर डाकघरांकडे वळावे**

शहरातील बहुतेक ग्राहकांचा मुख्य पोस्ट ऑफीसकडेच ओढा असतो. त्यामुळे येथील कर्मचाऱ्यांवर नेहमीच ताण असतो. शहरात टपाल खात्याची एकूण १७ कार्यालये आहेत. उपडाकघर म्हणून ओळखली जाणारी ही कार्यालये शहराच्या विविध भागांत आहेत. तेथेही पार्सल पाठविण्याची सोय उपलब्ध आहे. त्यामुळे अंबापेठ, रुक्मीणीनगर, राजापेठ, बुधवारा, गाडगेनगर, हव्याप्र मंडळ आदी भागांतील या कार्यालयांचाही नागरिकांनी लाभ घ्यावा, असे टपाल खात्याच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

# कृषी कार्यालयात वराहांचा धुमाकूळ

## बंदोबस्त करण्याची अंजनगाव येथील कृषी अधिकाऱ्यांची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अंजनगाव सुर्जी**

गावठी वराहामुळे शहरात मोठ्या प्रमाणात सर्वत्र अस्वच्छता निर्माण झाली असून त्यात शासकीय कार्यालयेही सुटली नाहीत. अंजनगाव बसस्थानक परिसरात तालुका कृषी कार्यालय आहे. या कार्यालयात ४० ते ५० अधिकारी, कर्मचारी कर्तव्यावर असतात तर शेतकर्यांचे महत्वाचे कार्यालय असल्याने दररोज तालुक्यातील अनेक शेतकरी कार्यालयात येतात. मात्र कृषी कार्यालय परिसरात डुकरांनी हैदोस घातला आहे. त्यामुळे कार्यालय परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. शेतकर्यांसह कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी यामुळे वैतागले आहेत. तालुका कृषी अधिकार्यांनी नगर परिषद प्रशासनाला पत्र देऊन वराहांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली.

नगर परिषद प्रशासनाने ठोस भूमिका घेऊन वराहांना शहराबाहेर घालवण्याची मागणी नागरिकांकडूनही करण्यात येत आहे. मात्र नगर परिषद प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. अंजनगाव सुर्जी शहराचा विकास मागील दहा ते पंधरा वर्षांत झपाट्याने झाला. त्यामुळे नव्याने अनेक वस्त्या निर्माण झाल्या. पावसाळा असल्याने शहरात मोठ्या प्रमाणात खुल्या जागेत पाण्याचे डबके साचले आहे. तसेच नवीन वस्तीच्या आजूबाजूला शेतजमीन आहे. या भागात सहजपणे वराह राहू शकतात. त्यामुळे बर्याच वर्षांपासून वराहपालन करणार्यांनी शहरात मोकाट वराह सोडली. परिणामी अनेक भागात अस्वच्छता दिसून येते. यामुळे आजारांना निमंत्रण मिळत आहे. त्यामुळे वराहांना शहराबाहेर घालवण्याची मागणी होत आहे.

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीची राज्यस्तरीय कार्यकारिणी जाहीर

## डॉ, सुनिल देशमुख, अ‍ॅड. दिलीप एडतकर, मिलिंद चिमोटे, किशोर बोरकर, भैय्या पवार व हरीभाऊ मोहोड यांचा समावेश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीची प्रदेश राज्यस्तरीय कार्यकारिणी गठीत करण्यात आली असून, अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सरचिटणीस के.सी.वेणुगोपाल यांनी काल रात्री प्रदेश कार्यकारिणी जाहीर केलेली आहे, प्रदेश कार्यकारिणीस अखिल भारतीय काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मान्यता दिली असल्याचे के.सी.वेणुगोपाल यांनी सांगितले आहे.अमरावती जिल्ह्यातुन डॉ सुनिल देशमुख वरीष्ठ उपाध्यक्ष, भैय्या पवार उपाध्यक्ष,अँड दिलीप एडतकर, मिलिंद चिमोटे,किशोर बोरकर व हरीभाऊ मोहोड यांचा सरचिटणीस पदावर समावेश करण्यात आला आहे.काँग्रेसच्या प्रदेश कार्यकारिणीत,३६ उपाध्यक्ष,१०८ सरचिटणीस व ९५ सचिव नेमण्यात आले आहेत.

# स्व.दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयात दीक्षारंभ समारंभ संपन्न




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

नांदगाव पेठ येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयात बी.ए. भाग एकला प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांसाठी दीक्षारंभ समारंभ आयोजित करण्यात आला. या समारंभाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे हे होते.विद्यापीठ गीताने दीक्षारंभ कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर वैराग्यमूर्ती श्री संत गाडगेबाबांच्या प्रतिमेला हारार्पण करून दीप प्रज्वलित करण्यात आले.

महाविद्यालयात शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ या वर्षात बी.ए. भाग एकला प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची, महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आणि महाविद्यालयातील विविध उपक्रमांची आणि विशेष म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व त्यानुसार तयार केलेल्या अभ्यासक्रमाची माहिती होण्याच्या दृष्टिकोनातून सदर दीक्षारंभ समारंभाचे आयोजन करण्यात आले. बी.ए. भाग एकच्या प्रवेश समितीचे आणि या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. गोविंद तिरमनवार यांनी सुरुवातीला प्रास्ताविकातून सदर समारंभाच्या आयोजनाची भूमिका विशद करीत उपस्थित सर्वांचे स्वागत केले. सदर कार्यक्रमाप्रसंगी डॉ. पंकज मोरे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची सर्व विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. यानंतर डॉ.सुनिता बाळापुरे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची रचना व अभ्यासक्रम याविषयीची विस्तृत माहिती नवप्रवेशित विद्यार्थ्यांना दिली. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. पी आर जाधव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. श्रीकांत माहुलकर यांनी खेळ व क्रीडा याविषयीची, सांस्कृतिक कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. गोविंद तिरमनवार यांनी युवा महोत्सव व महाविद्यालयाच्या युवा आविष्काराबाबत,ग्रंथपाल डॉ.विकास अडलोक यांनी ग्रंथालायाविषयी ,डॉ. सुनिता बाळापुरे यांनी महाविद्यालयीन व विद्यापीठ परीक्षा संदर्भातील आणि श्री दिलीप पारवे यांनी शिष्यवृत्ती व इतर योजनांविषयीची विस्तृत माहिती नव्याने प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना दिली. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांनी सर्व नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना महाविद्यालय व महाविद्यालयातील सर्व उपक्रमांविषयीची आवश्यक ती सर्व माहिती देत योग्य असे मार्गदर्शन केले. दीक्षारंभ कार्यक्रमानंतर महाविद्यालयातील बी.ए.भाग दोन व तीनच्या विद्यार्थ्यांनी नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांच्याशी संवाद साधला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.पंकज मोरे यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा.डॉ. पी आर जाधव, डॉ. राजेश ब्राह्मणे ,डॉ.श्रीकांत माहुलकर, डॉ. सुनिता बाळापुरे, डॉ.सुभाष पवार ,डॉ. विकास अडलोक ,श्री दिलीप पारवे,रेखा पुसतकर, विनायक पावडे,राहूल पांडे, अनिल शेवतकर,कोठार महाराज यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कु.निहारिका डोईफोडे, वैष्णवी गायकवाड, गायत्री सावरकर, ओम शेंदरकर, रोशन कामडी, योगेश महाजन यांच्यासह इतर विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# सालबर्डीमध्ये श्रावणात भक्तांची उसळलेली गर्दी

## स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन व निसर्गरम्य परिसर भाविकांना आकर्षित करतो

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मोर्शी**

हिंदू धर्मातील पवित्र श्रावण महिन्याला प्रारंभ झाल्यानंतर श्रीक्षेत्र सालबर्डी येथे भाविकांची मोठी गर्दी उसळली आहे. दिनांक २८ जुलैपासून प्रत्येक श्रावण सोमवारी येथे महाराष्ट्र व मध्यप्रदेशातून हजारो भाविक दर्शनासाठी दाखल होत आहेत.

सालबर्डी हे श्रीक्षेत्र अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यात असून, मध्यप्रदेश सीमेलगत वसलेले आहे. येथे सुमारे ६०० फूट उंच पहाडावर असलेल्या गुहेत स्वयंभू महादेवाची पवित्र पिंडी आहे. या शिवलिंगावर नैसर्गिकरित्या खडकातून पाणी झिरपत असते, ही बाब स्थानिकांसह भाविकांसाठी अद्भुत आणि आस्थेची ठरते.श्रावण महिन्यात बेलपत्र अर्पण करण्यासाठी महाराष्ट्र, मध्यप्रदेश व परिसरातील गावांतून भक्तगण वर्षानुवर्षे येथे दाखल होत असतात. विशेषतः श्रावण सोमवार हे महत्त्वाचे पर्व समजले जात असल्याने त्या दिवशी भाविकांची संख्या अधिकच वाढलेली दिसून येते.सालबर्डी परिसर निसर्गरम्य सौंदर्याने नटलेला आहे. वाहणारी नदी, हिरवाईने आच्छादलेले डोंगर, उंचच उंच वृक्ष, हत्तीडोह परिसर, तसेच विविध संत व देवतांची मंदिरे यामुळे हा परिसर पर्यटनाच्या दृष्टीनेही महत्वाचा आहे.



सध्या पावसाळी वातावरण असल्याने संपूर्ण परिसर अधिकच मोहक झाला आहे.भाविकांच्या सोयीसाठी स्थानिक प्रशासन, पोलिस यंत्रणा, ग्रामपंचायत व स्वयंसेवी संस्थांकडून विविध सेवा पुरविल्या जात आहेत. पिण्याच्या पाण्याची सोय, वाहतुकीसाठी वाहनांची व्यवस्था, तसेच गर्दी नियंत्रणासाठी सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.सालबर्डी हे केवळ धार्मिक श्रद्धेचे नव्हे, तर निसर्गप्रेमी व पर्यटकांसाठीही एक अद्वितीय ठिकाण म्हणून पुढे येत आहे.

# दोनशे वर्षापासूनचा पारंपरिक उत्सव धामोरी येथे बाप्पांचे दीड दिवसांकरिता आगमन

## बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकीत गावकऱ्यांचा मोठा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० वलगाव**

नागपंचमीच्या दिवशी सर्वत्र नागाचे पूजन होते; मात्र अमरावतीच्या भातकुली तालुक्यातील धामोरी या गावात गणपती बाप्पांचे दीड दिवसांकरिता आगमन झाले. २०० वर्षांहून अधिक कालावधीच्या या पारंपरिक उत्सवात गावकरी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.अवघ्या महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या गणपती बाप्पांचे आगमन होण्याकरिता अजून काही दिवस शिल्लक आहेत. मात्र धामोरी या गावात गणपतीची स्थापना हनुमान मंदिरात सार्वजनिकरीत्या केली गेली. या उत्सवात सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र आले. आगमन वाजतगाजत, तर विसर्जन मिरवणूक शांततेत केली जाते.महाराष्ट्रातील धामोरी हे गाव एकमेव असू शकते की, जिथेनागपंचमीच्या दिवशी



आगमन झालेल्या दीड दिवसाच्या गणपती बाप्पांचे पूजन केले जाते. पूजेचा पहिला मान अमोल वारघडे परिवारातील सदस्यांना परंपरेने लाभला आहे. या लंबोदराचे दर्शन घेण्याकरिता गावातील लग्न होऊन सासरी गेलेल्या मुली आपल्या पतीसह आवर्जून माहेरी आल्या होत्या,स्थापित झालेल्या दीड दिवसाच्या गणेशाच्या विसर्जनप्रसंगी मोठ्या संख्येने गावकरी सहभागी होते.

# राज्यातील १ हजार ९०० शिवभोजन केंद्रांवर संकटांची कुऱ्हाड

## किराणा दुकानदारांकडून उधारी बंद
## राज्य सरकारकडे सहा महिन्यांपासून देयके थकली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

केवळ १० रुपयांत गोरगरिबांच्या पोटाची भूक भागवणाऱ्या राज्यातील १ हजार ८०० शिवभोजन केंद्रांची देयके राज्य सरकारने मागील सहा महिन्यांपासून दिलेली नाहीत. त्यामुळे शिवभोजन केंद्रे आता बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.




राज्यात तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या काळात शिवभोजन थाळीची योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत महाराष्ट्रात १ हजार ९०० केंद्रे सुरू आहेत. यासाठी राज्य सरकारकडून केंद्र चालकांना शहरी भागात प्रतिथाळी ४० व ग्रामीण भागात प्रतिथाळी २५ रुपये अनुदान देण्यात येते. मात्र, सहा महिन्यांपासून केंद्र चालकांना अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून हे अनुदानच उपलब्ध करून दिलेले नाही. प्रत्येक जिल्ह्यात कोट्यवधींची बिले थकल्याने शिवभोजन केंद्र चालक आर्थिक संकटात सापडले आहेत. शिवभोजन योजनेअंतर्गत दररोज २ लाख थाळी वाटपाचे लक्ष्य ठेवण्यात आले. त्यासाठी वार्षिक २६४ कोटी रुपये खर्च आहे. राज्यात दररोज सरासरी पावणेदोन लाख थाळ्या वितरित केल्या जात आहेत. गोरगरिबांसोबतच अनुदान न मिळाल्याने शिवभोजन केंद्रांवर उदरनिर्वाह चालविणाऱ्या केंद्र चालकांनाही जगणे मुश्कील होईल.

**किराणा दुकानदारांकडून उधारी बंद**

सरकारकडून अनुदान मिळत नसल्याने काही केंद्र चालक व्याजाने पैसे काढून, तर कुठे उधारीवर किराणा माल मिळवून शिवभोजन केंद्र चालवत आहेत. सहा महिन्यांपासून उधारीची रक्कम थकली. त्यामुळे किराणा दुकानदार उधारीवर आणखी माल देण्यास तयार नाहीत.

# आश्रमशाळेच्या हलगर्जीपणामुळे सुमती जामुनकरचा मृत्यू

## १२ तासांनंतरही विद्यार्थिनीचा मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात होता तसाच पडून; नातलग संतप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अचलपूर**

आमदार केवलराम काळे यांच्या संस्थेद्वारे चालविण्यात येणाऱ्या नागापूर आश्रमशाळेतील घोर दुर्लक्षामुळे बामदेही येथील कु. सुमती सोमा जामुनकर या विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर तब्बल १२ तास उलटूनही ना शाळेतील एकही कर्मचारी उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर येथे पोहचला, ना तिच्या कुटुंबातील कोणी सदस्य तिथे होता. इतकेच नव्हे तर या दुर्घटनेची माहितीही तिच्या आई-वडिलांपासून अद्याप लपवली जात असल्याची चर्चा परिसरात होती.



कु. सुमतीचा मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात रात्रभर स्टेचर्स वर पडून होता त्यानंतर . घटनास्थळी माजी आमदार राजकुमार पटेल, रोहित पटेल, देवीदास कोगे, पंकज मोरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते पोहचले . त्यांनी याप्रकरणी तीव्र संताप व्यक्त केला असून दोषींवर कडक कारवाईची मागणी केली आहे.या प्रकारामुळे नागापूर आश्रमशाळेतील व्यवस्थापनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन दोषी असलेल्या संबंधितांविरोधात कठोर पावले उचलावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.दुपारी १२ वाजता मुलीचे नातेवाईक व परिवार रुग्णालयात पोहचला त्यावेळी एकच आक्रोश उडाला.

**शवविच्छेदन करण्यावरून नातलग संतप्त**

आदिवासी आश्रम शाळेत पाण्याची टाकी कोसळून मृत झालेल्या विद्यार्थिनीच्या नातेवाईकांनी अचलपूर येथे उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी नकार दर्शविला आहे. तर त्यांच्या मूळ धारणी तालुक्यातच मृत मुलीचे शवविच्छेदन व्हावे; अशी मृत मुलीच्या नातेवाईकांची मागणी आहे. यामुळे उपजिल्हा रुग्णालयात प्रचंड गोंधळ निर्माण झाला आहे. याठिकाणी पोलीस बंदोबस्त देखील आहे.

**तोडगा काढण्याची मागणी**

दरम्यान मृत मुलीचे नातेवाईक संतप्त झाले असून अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात पोलीस व प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबतच नातेवाईकांचा मोठा जमाव जमला असून येथे गोंधळाचे वातावरण आहे. तर संस्था चालकांनी समोरासमोर येऊन त्यांच्या नातेवाईकांसोबत चर्चा करून तोडगा काढावा अशी मागणी माजी आमदार राजकुमार पटेल यांनी केली आहे.

# रेशनकार्डवर नाव नोंदणीसाठी १०० रुपयांची मागणी

## अमरावती तहसील कार्यालयात आर्थिक पिळवणूक? पावतीशिवाय घेतले जातात पैसे, नागरिकांत संताप; प्रशासनाकडे कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

अमरावती तहसील कार्यालयात सामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक सुरू असून, रेशनकार्डावर नवीन सदस्याचे नाव नोंदवण्यासाठी तब्बल १०० रुपये मागितले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे हे पैसे पावतीशिवाय घेतले जातात, त्यामुळे यामागील भ्रष्टाचार उघड होत आहे.

तहसील कार्यालय पूर्वी प्रभात चौकात होते, सध्या सांस्कृतिक भवनाजवळील नवीन प्रशस्त इमारतीत स्थानांतरित झाले आहे. मात्र, कार्यालय बदलले तरी कर्मचाऱ्यांची वागणूक आणि भ्रष्टाचाराची पद्धत मात्र पूर्वीप्रमाणेच कायम असल्याचा अनुभव नागरिकांना येत आहे.



अनेकदा रेशन कार्डावरील सदस्यांची नोंद अचानक गायब होते आणि धान्य मिळणे थांबते. अशा वेळी कार्डधारकाने तहसील कार्यालयातील अन्नपुरवठा विभागात चौकशी केली, तर एक नाव नोंदवण्यासाठी १०० रुपये द्यावे लागतात, असे तेथील महिला ऑपरेटर सांगतात. ही नोंद ऑनलाईन पद्धतीने केली जाते, परंतु या रकमेची पावती मागितल्यास स्पष्ट नकार दिला जातो.

दररोज शेकडो नागरिक कार्यालयात विविध कारणांसाठी येत असताना, यांच्याकडूनही अशीच वसुली केली जात असेल का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.या प्रकारामुळे नागरिकांत प्रचंड असंतोष निर्माण झाला असून, जिल्हाधिकारी व पुरवठा विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांनी याची गंभीर दखल घ्यावी, दोषींवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# एकाच कुटुंबातील तिसऱ्या लाडक्या बहिणीचा पत्ता होणार कट

## अमरावतीमधील पुरुषांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ तर घेतला नाही?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत एका कुटुंबातील दोन महिलांनाच लाभ मिळणार असतानाही तिसऱ्या-चौथ्या महिलेनेही अर्ज केले. काहींनी रेशनकार्ड वेगळे असल्याचे दर्शविले, वय १८ नसतानादेखील १८ पूर्ण असल्याचे दाखवून अर्ज केले. पण, आता एकाच कुटुंबातील दोनपेक्षा जास्त असलेल्या लाभार्थींच्या नावापुढे 'एफएससी मल्टिपल इन फॅमिली असा शेरा मारून त्यांचा लाडकी बहीण योजनेतून लाभाचा पत्ता कट होणार आहे. विशेष म्हणजे राज्यात लाडकी बहीण योजनेचा लाभ १४ हजार २९८ पुरुषांनी घेतल्याची



गंभीर बाब समोर आली आहे. यामध्ये अमरावतीमधील पुरुषांचा तर समावेश नाही ना, याबाबत शंका उपस्थित केली जात आहे.

जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी एकूण ७ लाख २० हजार ६,६३५ महिलांनी अर्ज केले होते. यापैकी ६ लाख ९५ हजार ३५० लाडक्या बहिणीचे अर्ज मंजूर झाले आहेत, तर २९ हजार ९३७ अर्ज नाकारले आहेत. असे असताना अनेक महिलांनी वार्षिक उत्पन्न कमी दाखवून तसेच रेशनकार्ड वेगळे दर्शवून लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळविला आहे. आता मात्र पुढील महिन्यापासून कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त असलेल्या महिलांची पडताळणी होणार आहे. या योजनेसाठी १८ ते ६५ वयोगटांतील महिला पात्र, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असावे, एकाच कुटुंबातील दोन महिला, लाभार्थीच्या कुटुंबाकडे चारचाकी वाहन नको, अशा अटी होत्या.

**या महिलांचा लाभ झाला बंद**

वयाची ६५ वर्षे पूर्ण झालेल्या स्वतःचे किंवा कुटुंबाकडे चारचाकी वाहन, संजय गांधी निराधार योजनेसह अन्य वैयक्तिक योजनेच्या लाभार्थी, १८ वर्षे पूर्ण नसतानाही अर्ज केलेल्या.

**निराधार योजनेचाही घेताहेत लाभ**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत लाभार्थी असलेल्या अनेक महिला आजही संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेत आहेत. त्यामुळे यापुढे दोनपैकी एका योजनेचा लाभ महिलांना घेता येणार आहे. त्यामुळे कुठल्याही एका योजनेचा लाभ सोडावा लागणार आहे.

# अबब.... दहा वर्षीय मुलीच्या पोटातून अर्धा किलो केसांचा गोळा

## यशस्वी शस्त्रक्रिया करून काढला पोटातून केसांचा गोळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील एका दहा वर्षीय बालिकेला गेल्या तीन-चार महिन्यांपासून अन्नपचनाचा त्रास व्हायचा सारख्या मळमळ व उलटया व्हायच्या, अखेर अमरावती येथील बालरोग शस्त्रक्रिया तज्ञ डॉ उषा गजभिये यांनी या मुलीची यशस्वी शस्त्रक्रिया करून पोटातून तब्बल अर्धा किलो केसांचा गोळा काढून या बालिकेला व पालकांना दिलासा दिला..जिल्ह्यातील ग्रामीण भागातील तृप्ती (काल्पनिक नाव) या दहा वर्षीय मुलीला गेल्या तीन-चार महिन्या पासून पोटात जळजळ होणे व सतत उलट्यांचा त्रास होत होता. आई-वडिलांनी अनेक डॉक्टरांकडे नेले सोनोग्राफी एक्स-रे सर्व तपासण्या केल्या मात्र काही डॉक्टरांनी ॲसिडिटी असल्याचे ट्रीटमेंट करून सोडून दिले,मात्र या मुलीचा त्रास कमी होत नसल्याने अखेर तिच्या पालकांनी अमरावती येथील बालरोग शस्त्रक्रिया तज्ञ डॉक्टर उषा गजभिये यांच्याकडे या मुलीला उपचारासाठी आणले, डॉक्टरांनी या मुलीशी संवाद साधून चौकशी केली असता सदर मुलीने केस खाल्ले असावे असा संशय डॉ उषा गजभिये यांना आला. डॉक्टरांनी इतर सर्व तपासण्या करून लगेच तिच्या पोटावर शस्त्रक्रिया केली यावेळी या बालिकेच्या पोटातून तब्बल अर्धा किलो केसांचा गोळा तिच्या पोटातून काढण्यात आला.





या बालिकेला गेल्या तीन-चार वर्षांपासून केस खाण्याचे व्यसन जडले होते व त्यातूनच ती घरी कुणाचे लक्ष नसताना संधी मिळेल तेव्हा केस खायची,आई वडिलांनी तिला याबाबत अनेकदा हटकले सुद्धा, मात्र तिचे केस खाणे सुरूच होते व यातून अखेर तिच्या पोटात तब्बल अर्धा किलो केसांचा गोळा तयार झाला, आता या बालिकेची प्रकृती ठणठणीत आहे.केस खाणे, धागे खाणे, नख खाणे हे मानसिक आजाराचे लक्षण असू शकते वेळीच पालकांनी आपल्या मुलांकडे लक्ष देऊन त्यावर वेळीच उपचार करावा असा आव्हान देखील यावेळी डॉ गजभिये यांनी केले.

# फुलांची मागणी वाढली; भावात २०% वाढ

## बाजारात मागणीच्या तुलनेत आवक कमी, पावसामुळे खराब फुलांचा पुरवठा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३० अमरावती**

श्रावण महिन्यामुळे पूजा, हार तसेच मंदिरांच्या सजावटीसाठी लागणाऱ्या फुलांना मागणी वाढली आहे. मात्र सातत्याने सुरू असलेल्या पावसामुळे फुले खराब होत आहेत. बाजारात ओल्या फुलांची आवक मोठ्या प्रमाणावर आहे. चांगल्या प्रतीच्या फुलांची आवक कमी होत असल्याने झेंडू, शेवंती आणि निशीधंग फुलांच्या



भावात वाढ झाली.

चांगल्या प्रतीच्या फुलांना ग्राहक आणि विक्रेत्यांकडून मागणी आहे. मात्र, चांगल्या प्रतीच्या फुलांचे प्रमाण कमी असल्याने दरात झेंडू आणि शेवंतीच्या फुलांच्या भावात मागील दोन दिवसांच्या तुलनेत २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली. तसेच निशिगंध फुलांची मागणीच्या तुलनेत आवक कमी होत आहे. त्यामुळे या फुलांच्या भावातही ३० टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात वाढ झाली. बाजारात फुलांची आवक वाढल्यास भाव कमी होतील, असे विक्रेता सांगतात.

### मागणीमुळे भाव वाढले

श्रावण महिन्यात सण जास्त असतात. त्यामुळे मागणीनुसार भावात चढ-उतार होत राहणार आहे. नागपंचमी सणामुळे तयार गजरे व जुईच्या फुलांना ग्राहकांकडून मागणी वाढली होती. त्यामुळे मंगळवारी तयार गजऱ्याच्या ३०० ते ४०० ग्रॅमला ४०० ते ७०० रुपये भाव मिळाला. तर जुईच्या एक किलो फुलाला ६०० ते ७०० रुपये भाव मिळाला. तयार गजरे अन्य राज्यातूनही येत आहेत. तर शेवंतीची फुले पुणे जिल्ह्यातून येत आहेत.

**– विजय काळे, किरकोळ विक्रेता**

मागील काही दिवसांपासून राज्यातील बहुतांश भागात पाऊस पडत आहे. त्यामुळे फुले खराब होत आहेत. शेतकऱ्यांनी विक्रीसाठी पाठविलेल्या फुलांमध्ये भिजलेल्या मालाचे प्रमाण अधिक असल्याचे ठोक व्यापारी सागर माहेश्वरी यांनी सांगितले. श्रावण महिन्यात पूजेसाठी, हार व मंदिर सजावटीसाठी फुलांना मागणी वाढत असते. यंदाही फुलांना मागणी आहे. येत्या काळात ही मागणी टिकून राहणार असल्याचेही माहेश्वरी यांनी सांगितले.

# महिला आर्थिक विकास महामंडळच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचा अमरावतीत भव्य मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

महिला आर्थिक विकास महामंडळातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध प्रलंबित व न्याय्य मागण्यांसाठी आज अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा आणि धरणे आंदोलन केले.

हा मोर्चा भारतीय मजदूर संघ संलग्न महिला आर्थिक विकास महामंडळ कंत्राटी कर्मचारी संघ महाराष्ट्र यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. आंदोलनाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून झाली. शेकडो




महिला सहभागी होऊन जोरदार घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्या.

**कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे होत्या**

लोकसंचालित साधन केंद्रांना प्रशासकीय खर्च व मानधनासाठी २५ लाखांचा निधी तात्काळ उपलब्ध करावा. सी.आर.पी. (समुदाय साधन व्यक्ती) यांना 'उमेद' योजनेतील सीआरपीप्रमाणे दरमहा ६ हजार रुपये मानधन द्यावे. माविम स्थापन बचतगटांना 'उमेद' योजनेप्रमाणे ३० हजार रुपयांचा फिरता निधी मिळावा. बचतगटांना ७ टक्के व्याजदराने बँकांकडून कर्ज मिळावे. मोर्चात सहभागी महिलांनी प्रशासनाकडून वेळोवेळी दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देत तात्काळ निर्णय घेण्याची मागणी केली. प्रशासनाने याबाबत सकारात्मक भूमिका घेतली नाही, तर पुढील काळात आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

# डॉ. अवंती ठाकरे यांच्या दंतरोग चिकित्सालयाचे आज उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

स्थानिक साईनगर येथील साई रत्न लॉन जवळ बुधवार दिनांक ३० जुलैला सायंकाळी ५ वाजता डॉ. अवंती ठाकरे(वासनकर) यांच्या दंतरोग चिकित्सलायाचा उद्घाटन सोहळा राजापेठ येथील सुप्रसिद्ध ईएनटीशल्यविशारद डॉ. एम. एम.पाटील यांच्या हस्ते संपन्न होत आहे.या उद्घाटन सोहळ्यालावैद्यकीय,सामाजिक, राजकीय मंडळींची विशेष



उपस्थितीती राहणार आहे.वैद्यकीय क्षेत्रात पदार्पण करून दंत रोग तज्ञ चिकित्सालयाच्या माध्यमातून दंत रोगाच्या रुग्णांना सेवा देण्याचा मानस जोपासून डॉ. अवंती ठाकरे ह्या डेंटल स्पेशलिटी क्लीनिकच्या माध्यमातून सेवा देणार आहे .डॉ. अवंती ठाकरे बी.डी.एस .यांनी रुग्णसेवा यातच आमच्या जीवनाचं खरं स्वप्न दडलेल असल्याचं वृत्तपत्राशी बोलतांना त्यांनी सांगितले आहे.